# आपल्या सभोवतालचे जग

## भाग २

## इयत्ता तिसरी



विनामूल्य वितरणासाठी

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १.०४.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



# आपल्या सभोवतालचे जग

## भाग २

## इयत्ता तिसरी



समग्र शिक्षा

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

## इतिहास समिती

डॉ. गणेश राऊत (अध्यक्ष)
डॉ. मंजिरी भालेराव (सदस्य)
श्री. बापूसाहेब शिंदे (सदस्य)
श्री. वैजनाथ काळे (सदस्य)
श्री. सुभाष राठोड (सदस्य)
सौ. उषा खोपडे (सदस्य)
श्री. विजयकुमार इंगवले (सदस्य)
श्रीमती. पल्लवी घरणीकर (सदस्य)
श्री. रामकुमार राय (सदस्य)
श्री. नागेश शिंगणे (सदस्य)
श्री. रविंद्र भापकर (सदस्य)
श्री. संतोष तळेकर (सदस्य)
श्री. नितीन बडे (सदस्य)
श्री. राजन गरुड (सदस्य)
श्री. निलेश पोरे (सदस्य)
श्री. सुनिल मेश्राम (सदस्य)
श्री. हनुमंत जाधव (सदस्य)
कु. प्राजक्ता अंबुलकर (सदस्य)
श्री. दत्तात्रय चौधरी (सदस्य)
डॉ. सदानंद डोंगरे (सदस्य)
श्री. रामदास ठाकर (सदस्य)
श्रीमती. मनिषा सोनवणे (सदस्य)
डॉ. सोमनाथ रोडे (निमंत्रित)
श्री. मोगल जाधव (निमंत्रित)
श्री. अरूण जाधव (अभ्यासक्रम समन्वयक)
श्री. रामेश्वर लोटके (अभ्यासक्रम समन्वयक)
सौ. वर्षा सरोदे (सदस्य सचिव)

## नागरिकशास्त्र समिती

डॉ. संज्योत आपटे (अध्यक्ष)
प्रा. राजेंद्र भोईवार (सदस्य)
श्री. इरफान सय्यद (सदस्य)
डॉ. नागनाथ येवले (सदस्य)
श्री. विक्रम अडसूळ (सदस्य)
श्री. राजेंद्र टेकाडे (सदस्य)
श्रीमती. रोहिणी गव्हाणे (सदस्य)
डॉ. अशोक बांगर (सदस्य)
श्रीमती. भारती औटी (सदस्य)
श्री. श्यामकांत रुले (सदस्य)
श्री. चांदखान पठाण (सदस्य)
श्री. नागनाथ विभूते (सदस्य)
श्री. आकाश झाडे (सदस्य)
श्री. विनोद अवरादी (सदस्य)
श्री. श्रीनिवास मोरे (सदस्य)
श्रीमती. स्पृहा इंदू (सदस्य)
श्री. अनिल राजगुरू (सदस्य)
श्री. प्रमोद वाघमोडे (सदस्य)
डॉ. परिमल सुधाकर (निमंत्रित)
डॉ. विराज महाजन (निमंत्रित)
डॉ. अजिंक्य गायकवाड (निमंत्रित)
प्रा. वीणा केंची (निमंत्रित)
श्रीमती. वर्षाराणी भोपळे (अभ्यासक्रम समन्वयक)
सौ. वर्षा सरोदे (सदस्य सचिव)

## गाभा समिती सदस्य

डॉ. महेश्वर कळलावे
श्री. प्रशांत दिवेकर
श्री. मोहन शेटे
श्रीमती प्रतिमा गुप्ते

## समीक्षक

डॉ. सदानंद मोरे (गुणवत्ता परीक्षक)
डॉ. निता बोकील (गुणवत्ता परीक्षक)
ॲड. श्रीकांत दळवी (विधीतज्ज्ञ)
डॉ. शर्मिष्ठा ओक (CWSN तज्ज्ञ)

## लेखक

श्रीमती इंद्रायणी चव्हाण
डॉ. गायत्री लेले

## संयोजन

**श्रीमती वर्षा सरोदे**
(प्र. विशेषाधिकारी)
इतिहास व नागरिकशास्त्र, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व चित्रकार :** श्री. देवदत्त बलकवडे
**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद :** ७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश :**
**मुद्रक :**

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. शशांक कणिकदळे**
निर्मिती अधिकारी

## प्रकाशक

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५

## भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**यादवारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

### भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

प्रिय

विद्यार्थ्यांनो,

एकविसाव्या शतकातील पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांची ओळख करून देणारे 'आपल्या सभोवतालचे जग भाग २' हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांस अतिशय आनंद होत आहे. हा विषय इयत्ता तिसरीपासून तुम्ही पहिल्यांदाच अभ्यासत आहात. या विषयाच्या अभ्यासाने तुम्हांला तुमच्या परिसरातील विविध गोष्टींची नव्याने ओळख होणार आहे.

आपल्या कुटुंबापासून या पाठ्यपुस्तकातील आशयाची सुरुवात होते. नातेवाईक, नातेसंबंध, आपले शेजारी आणि त्यानंतर आपली आवडती शाळा यांबद्दल तुम्ही अधिक माहिती मिळवाल. आपल्या परिसरात भरणारे बाजार यांविषयीही माहिती घेणार आहात, तसेच आपल्या गरजा, समस्या समजून घेणार आहात. पाण्याचे महत्त्व, बचत, परिसरातील विविध ऐतिहासिक वास्तू, दळणवळणाच्या सोयीसुविधा, निसर्गाचे रक्षण व संवर्धन यांचीही माहिती तुम्हांला होणार आहे. आपण भारत देशात राहतो, त्यामुळे येथील परंपरा, येथील विविधता, समाजातील थोर व्यक्ती, समाजसुधारक यांविषयीही शिकणार आहोत. आपल्या देशात आपण एकजुटीने राहायचे हे तुमच्या लक्षात येईल.

पाठ्यपुस्तकातील ही भूमिका चित्ररूपाने व्यक्त करणाऱ्या मुखपृष्ठावर भारतातील विविधता दर्शवण्यासाठी भारताच्या स्थूल नकाशाचा उपयोग केला आहे.

पाठ्यपुस्तकातील विविध कृती करताना तुम्हांला विशेष आनंद होणार आहे. या पुस्तकात चर्चा, लेखन, चित्रनिरीक्षण, समजून घेणे, मते जाणून घेणे, आपले मत मांडणे अशा विविध कृतींद्वारे सहज सोप्या पद्धतीने तुम्ही विषयाची ओळख करून घेणार आहात. पाठ्यपुस्तकात आकर्षक चित्रे दिलेली आहेत. चित्रांतूनही पाठाचा आशय समजण्यास मदत होणार आहे. हसत-खेळत शिक्षण यावर पुस्तकात भर दिलेला आहे. आपणा सर्वांचे या नवीन विषयाच्या जगात खूप खूप स्वागत आणि इयत्ता तिसरीच्या अभ्यासासाठी शुभेच्छा!

इतिहास व नागरिकशास्त्र समिती, लेखक, चित्रकार व छायाचित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे. पालक, विद्यार्थी आणि शिक्षक यांना पाठ्यपुस्तकातील आशयाबाबत काही अडचणी वाटल्यास त्या पाठ्यपुस्तक मंडळाला अवश्य कळवाव्यात.

(अनुराधा ओक)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे

दिनांक : १९ एप्रिल २०२६
भारतीय सौर दिनांक : वैशाख शु. २, शके १९४८,
अक्षय्यतृतीया

# आपल्या सभोवतालचे जग भाग – २

| अ. क्र. | पाठाचे नाव | अभ्यासक्रम क्षमता | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG–१ विद्यार्थ्यांच्या सभोवतालच्या नैसर्गिक आणि सामाजिक सांस्कृतिक वातावरणाचा शोध घेणे आणि त्यात त्यांना गुंतवून ठेवणे.** | | | | |
| १ | **आपले कुटुंब** | C–१.२<br>कौटुंबिक आणि सामाजिक परस्परसंबंध (मनुष्य, प्राणी/निसर्ग) आणि परंपरा (कला, सण–उत्सव) यांचे वर्णन करतो. | • कुटुंबाचे विविध प्रकार व स्वरूप स्पष्ट करून नातेसंबंध सांगतो.<br>i) कुटुंबातील नातेसंबंध स्पष्ट करतो.<br>ii) कुटुंबाचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करतो. | <br><br>१,२,३,५,६<br>२,३,४,५,६ |
| २ | **कुटुंब वंशावळ** | C–१.५<br>स्थानिक संसाधनांचा वापर करून स्वत: वस्तूंची निर्मिती (वंशावळ, लिफाफे, कागदी प्राणी) स्वत:च्या घरी किंवा वर्ग सजावटीसाठी करतो. | • स्वत:च्या कुटुंबाची वंशावळ स्पष्ट करतो. | ७,८,९,१० |
| ३ | **माझी शाळा** | C १.४ – स्थानिक संस्थांचे (कुटुंब, शाळा, बँक, पोस्ट ऑफिस, मार्केट आणि ग्रामपंचायत) वेगवेगळ्या स्वरूपात (गोष्ट, चित्रे, तक्तायुक्त माहिती, अहवाल) कार्य स्पष्ट करतो आणि त्यांच्या भूमिकांचे विश्लेषण करतो. | • स्थानिक संस्थांची कार्ये सांगून भूमिकांचे विश्लेषण करतो.<br>i) शाळेची कार्ये स्पष्ट करून त्यांच्या भूमिकांचे विश्लेषण करतो. | ११,१२,१३,१४,<br>१५,१६,१७<br>११,१२,१३,१४,<br>१५,१६,१७ |
| ४ | **बाजार** | C १.४<br>स्थानिक संस्थांचे (कुटुंब, शाळा, बँक, पोस्ट ऑफिस, मार्केट आणि ग्रामपंचायत) वेगवेगळ्या स्वरूपात (गोष्ट, चित्रे, तक्तायुक्त माहिती, अहवाल) कार्य स्पष्ट करतो आणि त्यांच्या भूमिकांचे विश्लेषण करतो. | • बाजाराची (मार्केट) कार्ये स्पष्ट करून त्याच्या भूमिकांचे विश्लेषण करतो. | १८,१९,२०,२१,<br>२२,२३,२४,२५ |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG–६ विविध स्रोतांतून मिळविलेल्या माहितीचा उपयोग सभोवतालच्या परिसरातील विविध प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी करणे.**<br>**CG–४ सामाजिक आणि नैसर्गिक परिसरांबाबत संवेदनशीलता विकसित करणे.**<br>**CG–९ भारताच्या गौरवशाली इतिहासातील थोर व्यक्तींच्या (विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात) जीवनकार्याविषयी अभिरुची निर्माण करणे. त्यांच्या राष्ट्रउभारणीतील योगदानाची व सामाजिक परिवर्तनाची भूमिका स्पष्ट करणे.** | | | | |
| ५ | **आपल्या गरजा व समस्या** | C– ४.३<br>सभोवतालच्या वातावरणातील नैसर्गिक संसाधनाच्या वापराबाबत वर्णन करतो.<br>C–४.६<br>विभिन्न परिस्थितीत लोकांच्या गरजा ओळखतो. जसे: संसाधनांच्या उपलब्धतेच्या अटी, समान संधी, कार्य विभागणी आणि निवारा इत्यादी.<br>C– ६.१<br>स्वतंत्रपणे किंवा गटांमध्ये विशिष्ट प्रश्नांची साधारण चौकशी करतो.<br>C–९.२<br>चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटावर मात करता येते. हे थोर व्यक्तींच्या चरित्रातून आत्मसात करतो. | • सभोवतालच्या वातावरणातील नैसर्गिक संसाधनांच्या वापराबाबत माहिती सांगतो.<br>• मानवांच्या मूलभूत गरजांची यादी करून, त्यांचे महत्त्व सांगतो.<br>• उपलब्ध संसाधने व कुशलता यांनुसार लोकांमध्ये कार्यविभागणी होते हे सांगतो.<br>• परिसरातील लोकांच्या समस्या, गरजा योग्य प्रश्नांच्या माध्यमातून समजून घेऊन करावयाच्या उपाययोजना सुचवतो.<br>• दिव्यांगांसाठी सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या सोयीसुविधा यांची प्रश्नाच्या आधारे माहिती घेतो.<br>i) परिसरातील लोकांच्या गरजा व समस्या यांची यादी करून त्यांचे वर्गीकरण करतो.<br>• चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटावर मात करता येते यांची उदाहरणे सांगतो. | २६,२७,२८, २९, ३०<br>२६,२७,२८, २९, ३०,३३,३४<br>३१,३२,३३,३४, ३५,३६<br>३१,३२,३३,३४, ३५,३६<br>१३,१४,३२,३३, ३४,३५,३६,८३<br>२६,२८,२९<br>३४,३६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | **जलसाक्षरता** | C-९.३<br>थोर व्यक्तींच्या चरित्रातून समता, न्याय, पर्यावरण रक्षण, जलसाक्षरता इत्यादी बाबींचा बोध घेतो व त्याप्रमाणे आचरण करतो. | • जलसाक्षरता ही संकल्पना समजून घेऊन थोर व्यक्तींनी जलसाक्षरतेबद्दल केलेले कार्य समजून घेतो व आचरणात आणतो. | ३७,३८,३९,४०, ४१,४२,४३ |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG-४ सामाजिक आणि नैसर्गिक परिसराबाबत संवेदनशीलता विकसित करणे.<br>CG-२ परिसरातील परस्पर संबंध निरीक्षण आणि अनुभवातून समजून घेऊन 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेचा बोध करून घेणे.<br>CG-६ विविध स्रोतांतून मिळवलेल्या माहितीचा उपयोग सभोवतालच्या परिसरातील विविध प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी करणे.<br>CG-८ मानवी उत्क्रांतीचे टप्पे व प्रत्येक टप्प्यातील सांस्कृतिक आणि सामाजिक बदलांचे आकलन करणे.** | | | | |
| ७ | **भारतीय परंपरा व सांस्कृतिक विविधता** | C-२.२<br>सभोवतालच्या परिसरातील नैसर्गिक पर्यावरण आणि सांस्कृतिक प्रघातातील संबंध (कामाचे प्रकार, अन्न, सण, परंपरा) स्पष्ट करतो. | • पीक हंगाम व त्यासंबंधाने येणारे सण आणि उत्सव यांची माहिती सांगतो.<br>• परिसरातील नैसर्गिक पर्यावरण व सांस्कृतिक परंपरा यांचा सहसंबंध जोडतो. | ४४,४५,५१ |
| | | | • परिसरातील पर्यावरणीय घटकांची माहिती सांगतो. | ४६,४८ |
| | | | • सांस्कृतिक प्रघात/परंपरा यांचा सभोवतालच्या पर्यावरणाशी सहसंबंध जोडतो. | ४६,४७,४९ |
| | | C-४.२<br>सभोवतालच्या परिसरातील सांस्कृतिक विविधतेचे (अन्न, वेशभूषा, खेळ, विविध हंगाम, कापणीशी आणि पेरणीशी संबंधित सण-उत्सव) निरीक्षण करून वर्णन करतो. | • परिसरातील लोकांचे अन्न व वेशभूषा यांतील विविधता सांगतो.<br>• परिसरातील खेळांची माहिती सांगतो. | ४६,४९,५०,५१ |
| | | C- ६.२<br>निरीक्षणे आणि निष्कर्षाचे सर्जनात्मक माध्यमाद्‌वारे (चित्रे, आकृती, कविता, नाटक, संहिता, खेळ, मौखिक अथवा लेखी अभिव्यक्ती) सादरीकरण करतो. | • पारंपरिक खेळांचे निरीक्षण आणि निष्कर्ष यांचे सादरीकरण करतो. | ४८,४९,५० |
| | | | • पारंपरिक लोककलांचे निरीक्षण आणि निष्कर्ष यांचे सादरीकरण करतो. | ४४,४५,४७,५० |
| | | C-८.२<br>भूतकाळातील व वर्तमानातील चालीरीती, परंपरा, तंत्रे यांच्यातील बदलांची माहिती घेतो व स्पष्ट करतो. | • भूतकाळातील व आधुनिक काळातील चालीरीती व परंपरा यांची माहिती स्पष्ट करतो. | ४७,४९,५०,५१ |
| ८ | **दळणवळण** | C-२.३<br>परिसरातील बदलांचा, कौटुंबिक आणि सामाजिक बदलांचा वाडवडिलांनी सांगितलेल्या गोष्टींवरून (व्यवसायातील बदल, आहाराच्या सवयी, संसाधने, दळणवळण, समारंभ) संबंध प्रस्थापित करतो. | • पारंपरिक व आधुनिक दळणवळणाच्या साधनांची संकल्पना स्पष्ट करतो. | ५२,५३,५५,५७ |
| | | | i) दळणवळणाची संकल्पना सांगून प्रकार स्पष्ट करतो. | ५३,५४,५५,५६, ५७,५८ |
| | | | ii) पारंपरिक व आधुनिक दळणवळणाची साधने सांगतो. | ५३,५४,५५,५६, ५७,५८ |
| | | | iii) दळणवळणाच्या साधनांमध्ये काळानुरूप झालेले बदल सांगतो. | ५३,५४,५५,५६, ५७, ५८ |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG-९ भारताच्या गौरवशाली इतिहासातील थोर व्यक्तींच्या (विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात) जीवनकार्याविषयी अभिरुची निर्माण करणे. त्यांच्या राष्ट्रउभारणीतील योगदानाची व सामाजिक परिवर्तनाची भूमिका स्पष्ट करणे.** | | | | |
| ९ | **ऐतिहासिक वास्तू** | C- ९.५<br>स्थानिक परिसरातील ऐतिहासिक घटना, प्रसंग, स्थळे, स्मारके यांबाबत माहिती संकलित करतो. | • स्थानिक परिसरातील ऐतिहासिक वास्तू, स्थळे, स्मारके यांना भेटी देऊन, यांच्याशी संबंधित ऐतिहासिक घटना, प्रसंग यांची माहिती संकलित करून, वर्णन करतो. | ५५,५९,६०, ६१, ६२,६३,६४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG–९ भारताच्या गौरवशाली इतिहासातील थोर व्यक्तींच्या (विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात) जीवनकार्याविषयी अभिरुची निर्माण करणे. त्यांच्या राष्ट्रउभारणीतील योगदानाची व सामाजिक परिवर्तनाची भूमिका स्पष्ट करणे.** | | | | |
| १० | **गाथा, शौर्याची आणि क्रांतीची** | C– ९.४<br>सामाजिक समता, बंधुता आणि समरसता ही मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी संतांनी व समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांपासून प्रेरणा घेतो व ही मूल्ये अंगिकारण्याचा प्रयत्न करतो.<br>C– ९.६<br>भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या थोर पुरुषांच्या व क्रांतिकारकांच्या शौर्यगाथा सांगतो व भूमिका पालन करतो.<br>C– ९.२<br>चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटावर मात करता येते. हे थोर व्यक्तींच्या चरित्रातून आत्मसात करतो.<br>C–९.१<br>इतिहासातील थोर व्यक्तींच्या जसे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वातील विविध स्फूर्तिदायक घटना सांगतो व विश्लेषण करतो. | • सामाजिक समता, बंधुता आणि समानता ही मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या थोर व्यक्तींची व समाजसुधारकांची माहिती सांगून स्फूर्तिदायक प्रसंगांतून प्रेरणा घेऊन आचरण करतो.<br>• आपल्या परिसरातील थोर पुरुष, स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारक यांच्या शौर्यगाथा सांगून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेल्या योगदानाची माहिती देतो.<br>• चातुर्य, धैर्य, विवेक यांचा वापर करून जीवनातील समस्येवर मात करतो.<br>• थोर व्यक्तींच्या जीवनातील स्फूर्तिदायक प्रसंगांचे वर्णन करतो. | ६५,६६,६७,६८<br>६५,६६,६७,६८<br>६६,६७,६८<br>६५,६७,६८,६९ |
| ११ | **पर्यावरण रक्षण : माझी जबाबदारी** | C– १०.५<br>स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि इतर सामाजिक कार्यात सहभाग घेतो व स्वतःची जबाबदारी ओळखतो. | • परिसर स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन, त्यांचे महत्त्व सांगतो.<br>• वृक्षारोपण या उपक्रमात सहभागी होऊन, वृक्षसंवर्धनासाठीच्या उपक्रमाचे वर्णन करतो. | ७०,७१,७२<br>७०,७१,७२,७३, ७४,७५ |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG– ९ भारताच्या गौरवशाली इतिहासातील थोर व्यक्तींच्या (विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात) जीवनकार्याविषयी अभिरुची निर्माण करणे, त्यांच्या राष्ट्रउभारणीतील योगदान व सामाजिक परिवर्तनाची भूमिका स्पष्ट करणे.<br>CG–१० संविधानात्मक जबाबदाऱ्यांची जाणीव निर्माण करणे व लोकशाही संकल्पना समजून घेणे.** | | | | |
| १२ | **राष्ट्रीय एकात्मता** | C–१०.३<br>गाभाभूत घटकांची संकल्पना समजून घेतो व भारताची राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याच्या दृष्टिकोनातून गाभाभूत घटकांचा अन्वयार्थ लावतो व विश्लेषण करतो. | • गाभाभूत घटकातील राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व ओळखतो. | ७६,७७,७८, ७९ |
| १३ | **चला ऐकू या, बोलू या आणि समजून घेऊ या.** | C–९.२<br>चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटांवर मात करता येते हे थोर व्यक्तींच्या चरित्रांतून आत्मसात करतो.<br>C–१०.६<br>आपले विचार आणि मत मोकळेपणाने व्यक्त करून इतरांच्या मतांचा आदर करतो व सर्वांशी समान वर्तन करतो. | • चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटांवर मात करता येते याची उदाहरणे सांगतो.<br>• विविध विषयांवर आपले विचार मांडून, इतरांच्या मतांचा आदर करतो. | ८०,८१,८२,८३, ८४<br>८०,८१,८२,८३, ८४ |

- **नकाशांविषयी टिप –** सदर पाठ्यपुस्तकात वापरण्यात आलेले नकाशे हे शैक्षणिक उद्देशासाठी तयार करण्यात आलेले आहेत. त्यांचा राजकीय व भौगोलिक प्रमाणासाठी उपयोग ग्राह्य धरण्यात येऊ नये, तथापि काही त्रुटी असल्यास त्या तांत्रिक मर्यादेमुळे असू शकतील.

## शिक्षकांनी पाठ्यपुस्तक हाताळताना

- राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मुख्य उद्देश हा राज्यातील सर्व विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती सुधारणे हा असल्याने पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीच्या प्राथमिक पृष्ठांत समाविष्ट असलेल्या अध्ययन निष्पत्ती सर्वांनी आवर्जून अध्यापनाच्या वेळी समोर ठेवणे आवश्यक आहे.
- प्रत्येक पाठाचे अध्यापन नियोजन करताना अध्ययन निष्पत्तीनुसार पाठातील अध्ययन अनुभव आणि विविध कृती यांची योजना करावी.
- पाठांमध्ये बहुविद्याशाखीय दृष्टीकोनातून विविध अध्ययन अनुभूती योजल्या आहेत, याचा साकल्याने विचार करावा. विद्यार्थ्यांना विविध विषयांच्या साहाय्याने एकात्मिक पद्धतीने सहजपणे अध्ययन होईल याची जाणीव करून घ्यावी.
- विविध कृतींच्या आधारे विषयाची समज वृद्धिंगत करता येईल.
- विद्यार्थ्यांना विविध अनुभूती देताना भारतीय ज्ञानप्रणाली, पंचकोश या बाबतीतही माहिती होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
- परिसरातील विविध घटकांचे जतन, संवर्धन, भारतीय संस्कृती, परंपरा, विविधता यांची ओळख करून देणे गरजेचे आहे. पाठ्यपुस्तकातील ही भूमिका चित्ररूपाने व्यक्त करणाऱ्या मुखपृष्ठावर भारतातील विविधता दर्शवण्यासाठी भारताच्या स्थूल नकाशाचा उपयोग केला आहे. देशाच्या प्रगतीसाठी राष्ट्रीय एकात्मता जोपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे भान अध्ययन अनुभूतींची रचना करताना ठेवणे गरजेचे आहे.
- पुस्तकात स्थानिक परिसरातील सर्व ऐतिहासिक वास्तू, थोर व्यक्ती इत्यादींची माहिती पृष्ठमर्यादेमुळे देणे शक्य नसते, त्यामुळे अध्ययनात स्थानिक परिसरातील विविध उदाहरणांचा समावेश करावा. उपक्रम, कृती यांमध्ये स्थानिक बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे.
- आपल्या गरजा, त्या पूर्ण करताना येणाऱ्या समस्या, तसेच पर्यावरणाचे जतन, जलसाक्षरता या महत्त्वाच्या विषयांचीही सोप्या भाषेत, विविध अनुभूतींच्या आधारे जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.
- आपल्या परिसरातील ऐतिहासिक वास्तूंची ओळख, त्यांच्या जतनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे.
- आशयाचे ओझे वाढू नये यासाठी पाठ्यपुस्तकात प्रत्येक मुद्द्याची सविस्तर माहिती पाठात उदाहरणांसह व स्पष्टीकरणासह देणे शक्य नसते. शिक्षकांनी अध्ययनापूर्वी विविध संदर्भांच्या आधारे विद्यार्थ्यांना आशय अधिक सोपा होण्याच्या दृष्टीने आवश्यक माहिती त्या-त्या ठिकाणी देणे गरजेचे आहे.
- शिक्षकांनी सहलीद्‍वारे क्षेत्रभेट घडवून आणावी. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव द्यावेत. उदाहरणार्थ, बालआनंद मेळावा, वास्तूंना भेटी देणे, विविध संग्रहालयांना भेटी देणे, परिसर सहली, इत्यादी.
- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त असणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करावे.
- शिक्षकांसाठी या पृष्ठावर विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांची भाषा (Sign Language ) तसेच अन्य पूरक अध्यापनशास्त्रीय पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना; ज्या पद्धतीने शक्य असेल त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# अनुक्रमणिका


| पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. आपले कुटुंब | १ |
| २. कुटुंब वंशावळ | ७ |
| ३. माझी शाळा | ११ |
| ४. बाजार | १८ |
| ५. आपल्या गरजा व समस्या | २६ |
| ६. जलसाक्षरता | ३७ |
| ७. भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक विविधता | ४४ |
| ८. दळणवळण | ५२ |
| ९. ऐतिहासिक वास्तू | ५९ |
| १०. गाथा : शौर्याची आणि क्रांतीची | ६५ |
| ११. पर्यावरण रक्षण : माझी जबाबदारी | ७० |
| १२. राष्ट्रीय एकात्मता | ७६ |
| १३. चला ऐकू या, बोलू या आणि समजून घेऊ या | ८० |



# १. आपले कुटुंब





मीनाच्या घरी खूप लगबग सुरू होती. दोन दिवसांनी तिच्या अभिदादाचे लग्न होते. त्यामुळे घरात उत्साहाचे वातावरण होते. वहिनी येणार म्हणून मीना खूपच आनंदात होती. मीनाचे काका-काकू आणि चुलतभाऊ, मामा-मामी आणि मामेबहीण, मावशी आणि मावसभाऊ, मावसबहीण, आत्या, आतेबहीण असे सगळे नातेवाईक लग्नानिमित्त एकत्र जमले होते. मामा-मामीने त्यांचा चार वर्षांचा नातूही सोबत आणला होता. सर्वजण त्याच्याशी खेळण्यात दंग झाले होते आणि त्याची काळजीही घेत होते.

मीनाच्या आईचे आईवडील आणि वडिलांचे आईवडील असे दोन आजी-आजोबा असल्यामुळे मीनाचे खूपच लाड होत होते. मीना आणि तिची भावंडे मोठ्या माणसांना मदत करत होती. आजी-आजोबा सगळ्या कामांवर देखरेख करत होते. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करत होते. सगळे नातेवाईक एकमेकांबरोबर मिळूनमिसळून, हसतखेळत काम करत होते.

## ओळखा पाहू.

**नाते ओळखा –** वडिलांचा भाऊ, आईची बहीण, आत्याची मुलगी, मावशीचा मुलगा

## सांगा पाहू!

- तुम्ही आईवडिलांना कोणत्या कामांत मदत करता?
- त्यांपैकी तुमच्या आवडीची कामे कोणती?

मीनाच्या कुटुंबात तिचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा आणि बहीण-भाऊ एकत्र राहतात. सीमाताई ही मीनाची सख्खी बहीण आहे. अभिदादा हा मीनाचा आणि सीमाताईचा चुलतभाऊ आहे, कारण तो मीनाच्या काका-काकूंचा मुलगा आहे, म्हणजेच मीना आणि सीमाताई या दोघी अभिदादाच्या चुलत बहिणी आहेत.

**आपण या प्रकारे आपल्या कुटुंबाचा तक्ता तयार करू या!**




**कुटुंब म्हणजे एकमेकांशी नाते असलेल्या माणसांचा समूह होय. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणे–**



मोठे कुटुंब

**मोठे कुटुंब :** ज्या कुटुंबात आईवडील, आजी-आजोबा, काका-काकू, चुलत भावंडे एकत्र राहतात ते मोठे कुटुंब होय. त्यालाच 'एकत्र कुटुंब' असेही म्हणतात.



छोटे कुटुंब

**छोटे कुटुंब :** ज्या कुटुंबात आईवडील आणि त्यांची मुले एकत्र राहतात ते छोटे कुटुंब होय.



विस्तारित कुटुंब

**विस्तारित कुटुंब :** आपल्या आईकडचे आणि वडिलांकडचे नातेवाईक म्हणजे 'आपले विस्तारित कुटुंब' असते. विस्तारित कुटुंबातील सदस्य एकाच घरात, एकत्र राहत नाहीत. मात्र वेळप्रसंगी ते एकमेकांना मदत करतात. एकमेकांची काळजी घेतात. एकमेकांच्या सुख-दु:खाच्या क्षणी ते सहभागी होतात.

**एकल पालकत्व असलेले कुटुंब :** काही कुटुंबात, आईवडील यांच्यापैकी कोणीतरी एकच पालक मुलांची काळजी घेतो. त्यांचे संगोपन करतो. अशा कुटुंबाला 'एकल पालकत्व कुटुंब' म्हणतात.



एकल पालकत्व असलेले कुटुंब

### चर्चा करा.

- मीनाचे कुटुंब कोणत्या प्रकारचे आहे?
- तुमचे कुटुंब कोणत्या प्रकारचे आहे?



सीमाताईच्या मैत्रिणी सुश्मिता आणि यास्मिन यांनी मिळून दारासमोर सुंदर रांगोळी काढली. अभिदादाचे मित्र डेव्हिड आणि गुरूदीप यांनी फुलांच्या तोरणांनी घर सजवले.

मीनाचे शेजारीही मदतीसाठी आले होते. कोणाकडे एखादा समारंभ असेल तर सगळे मिळून तो साजरा करतात. गरज असेल तेव्हा एकमेकांना मदतही करतात. मागच्या वर्षी मीनाचे आजोबा आजारी होते. तेव्हा तिच्या शेजाऱ्यांनी खूप मदत केली होती. सुट्टीच्या दिवसांत संध्याकाळच्या वेळी शेजारची छोटी मुले मीनाच्या अंगणात जमतात. मीनाची आजी त्यांना छान छान गोष्टी सांगते.

### सांगा पाहू!

शेजाऱ्यांसह तुम्ही कोणते सण-समारंभ साजरे करता?

### माहीत आहे का तुम्हांला?

आपण स्वत:, आपले कुटुंब, मित्र-मैत्रिणी, सहकारी, शेजारी इत्यादी हे आपल्या समाजातील घटक असतात. विविध कुटुंबांचा मिळून समाज बनतो.

मीनाच्या घरात एक कुत्रा व एक मांजर होते. घरात एवढी माणसे बघून मोत्या कुत्र्याला आनंद झाला होता. तो शेपूट हलवत घरभर फिरत होता. जेवणानंतर कुटुंबातील काही सदस्य सापशिडी खेळायला बसले, तेव्हा मोत्याही तिथे येऊन बसला. मनीमाऊ मात्र नेहमीप्रमाणे दूध पिऊन झाल्यावर कोपऱ्यात गाढ झोपून गेली.


सापशिडीचा खेळ खेळताना

मीनाच्या अंगणातील एका कोपऱ्यात मातीची दोन भांडी ठेवलेली आहेत. मीना रोज त्यामध्ये पक्ष्यांसाठी पाणी आणि दाणे ठेवते.

- आपल्या परिसरातील वृक्ष, प्राणी-पक्षी हे आपल्या जीवनातील महत्त्वाचे घटक असतात.
- आपण झाडे लावतो, वेगवेगळ्या प्राण्यांची आणि पक्ष्यांची काळजी घेतो.
- आपण विविध सण-समारंभांच्या माध्यमातून एकत्र येतो आणि आनंद साजरा करतो.

### जरा लिहू या.

| कामे | घरात हे काम कोण करते ? |
|---|---|
| स्वयंपाक करणे. | |
| घरातील साफसफाई करणे. | |
| कपडे धुणे. | |
| बाजारातील खरेदी करणे. | |
| वडीलधाऱ्या/ आजारी व्यक्तींची काळजी घेणे. | |

### चित्रांतील व्यक्ती काय करत आहेत, ते चौकटीत लिहा.






कुटुंब लहान असो किंवा मोठे, कुटुंबातील लोक मिळूनमिसळून एकत्र राहतात. एकमेकांची काळजी घेतात. एकमेकांना मदत करतात. कामे वाटून घेतात. त्यांच्यामध्ये एकमेकांविषयी प्रेमाची, आदराची भावना असते. कुटुंबातील वातावरण सुरक्षित असते. वेगवेगळ्या संस्कृतींची अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. अशी आनंदी कुटुंबे मिळून आनंदी समाज घडतो.



### करून पाहा.

* तुमच्या विस्तारित कुटुंबातील सदस्यांची यादी करा.
* शेजारच्या कुटुंबातील लोकांची माहिती घ्या.



## स्वाध्याय

**प्र.१ कोणते लिहा.**

(अ) मामा-मामी सोबत आलेला ------------------------

(आ) सर्व कामांवर देखरेख ठेवणारे ------------------------

(इ) मोठ्या माणसांना मदत करणारे ------------------------

(ई) मीनाचा चुलत भाऊ ------------------------

**प्र.२ कोणकोण राहतात ते लिहा.**



छोटे कुटुंब

------------------------
------------------------
------------------------
------------------------



एकल पालकत्व असलेले कुटुंब

------------------------
------------------------
------------------------
------------------------



मोठे कुटुंब

------------------------
------------------------
------------------------
------------------------

**प्र.३ तुमच्या कुटुंबातील खालील सदस्यांची घरातील कामे लिहा.**

(अ) आई ............................................................

(आ) वडील ............................................................

(इ) आजी ............................................................

(ई) आजोबा ............................................................

(उ) मी ............................................................

(ऊ) माझी भावंडे ............................................................

**प्र.४ पुढील चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा.**

(अ) सीमाताई ही मीनाची चुलत बहीण आहे.

............................................................

(आ) विस्तारित कुटुंबात फक्त वडिलांकडील नातेवाईक असतात.

............................................................

(इ) पाळीव प्राणी हे कुटुंबातील सदस्य नसतात.

............................................................

**प्र.५ दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अभिदादाच्या लग्नासाठी कोणी कोणती तयारी केली ?

(आ) कुटुंबामध्ये आपल्या कोणकोणत्या गरजा पूर्ण होतात ?

(इ) तुमचा आवडता पाळीव प्राणी कोणता ? त्याची काळजी तुम्ही कशी घेता ?

**उपक्रम**

- तुमच्या कुटुंबातील नातेवाइकांचे फोटो मिळवून चिकटवहीत चिकटवा आणि त्याखाली फोटोतील व्यक्तींबरोबर असलेले तुमचे नाते लिहा.
- तुमच्या परिसरातील पाळीव प्राण्यांची व पक्ष्यांची यादी करा.

***





# २. कुटुंब वंशावळ



कपाटाची आवराआवर करताना वर्षाला तिच्या आईवडिलांच्या लग्नाचा अल्बम मिळाला. अल्बम चाळल्यावर त्या काळात आज दिसणाऱ्या व्यक्ती पाहताना थोड्या वेगळ्या दिसत होत्या. त्यामध्ये आईवडिलांबरोबर संपूर्ण कुटुंबाचा एक फोटो होता. वर्षाने आपल्या आईला त्याबद्दल विचारले. आईने सांगायला सुरुवात केली. ती म्हणाली, ''वर्षा, हा आपल्या साऱ्या कुटुंबाचा एकत्र फोटो आहे बरं. ओळख पाहू यातले कोणकोण तुला माहिती आहेत ते.'' वर्षाने फोटो नीट पाहून ओळखीच्या व्यक्तींची, नातेवाइकांची नावे सांगितली. काही व्यक्ती मात्र तिला ओळखता आल्या नाहीत.

''आई, या फोटोत कोण आहेत?'' वर्षाने विचारले. आई म्हणाली, ''वर्षा ही तुझ्या वडिलांची आजी आहे.'' वर्षाला वडिलांची आजी म्हणजे तिची पणजी पाहून आनंद झाला. त्यामुळे तिला आपले आईवडील, आईवडिलांचे आईबाबा म्हणजे तिचे आजी-आजोबा आणि आजोबांची आई अशा नातेवाइकांचे फोटो पाहायला मिळाले. यात तिला आपले वडील-आजोबा-पणजोबा अशा तीन पिढ्यांची ओळख झाली. पिढी म्हणजे प्रत्येक कुटुंबातील आधी असलेल्या व्यक्ती. आता हेच पाहा ना, वर्षा, तिचे आईवडील, आजी-आजोबा आणि त्यांचेही आईवडील यांच्यामधूनच वर्षाला तिच्या कुटुंबाची 'वंशावळ' करता आली.



मी तुझ्या वडिलांची आई, मी तुझी कोण?
---------------------------

मी तुझ्या वडिलांचा मुलगा, मी तुझा कोण?
---------------------------

मी तुझ्या आईची आई, मी तुझी कोण?
---------------------------

मी तुझ्या आईचे वडील, मी तुझा कोण?
---------------------------

**सांगा पाहू मी कोण?**



मी तुझ्या वडिलांचे वडील, मी तुझा कोण?
---------------------------

मी तुझ्या वडिलांचा भाऊ, मी तुझा कोण?
---------------------------

मी तुझ्या वडिलांची मुलगी, मी तुझी कोण?
---------------------------

मी तुझ्या वडिलांची बहीण, मी तुझी कोण?
---------------------------

## वंशावळ

वंशावळ म्हणजे कुटुंबातील सदस्यांची पिढ्यांनुसार मांडणी. यामध्ये आईवडील, आजी-आजोबा, पणजी-पणजोबा अशा पिढ्यांची नावे असतात.

वंशावळ ही आपल्या कुटुंबाचा लहानसा इतिहास असतो. आपल्या कुटुंबाचा इतिहास वंशावळीतून कळतो. आपल्या कुटुंबातील पूर्वज कोण होते हे जाणून घेता येते. आपल्या वंशावळीत कुटुंबातील व्यक्तींची नावे आणि आडनावे माहीत होतात.

**वंशावळ म्हणजे काय ते खालील आकृतीवरुन समजून घेऊ या.**



**समजून घेऊ या.**




वर्षाचा कुटुंबवृक्ष

### वंशावळीचा अभ्यास का केला जातो?

- **कौटुंबिक इतिहास समजून घेण्यासाठी :** कुटुंबाच्या इतिहासाची आणि पूर्वजांची माहिती मिळवण्यासाठी आपण वंशावळीचा अभ्यास करतो.
- **नातेसंबंध समजून घेण्यासाठी :** कुटुंबातील सदस्यांचे नातेसंबंध आणि त्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध वंशावळीतून समजतात.
- **वंशाची माहिती मिळवण्यासाठी :** ही पद्धत एखाद्या व्यक्तीची किंवा कुटुंबाची मूळ ओळख शोधण्यास मदत करते.

### वंशावळ कशी तयार केली जाते?

कुटुंबाच्या वंशावळीची नोंद एका मोठ्या झाडाच्या म्हणजेच कुटुंबवृक्षाच्या रूपात केली जाते. प्रत्येक नवीन पिढी जन्माला येणे म्हणजे वंशवृक्षाचा विस्तार होणे. वंशवृक्षामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना आपल्या पूर्वजांची माहिती मिळते. नव्या पिढीला, जुन्या पिढ्यांची ओळख याद्वारे होते.



## स्वाध्याय

**प्र.१ योग्य जोड्या जुळवा.**

| अ गट | उत्तर | ब गट |
|---|---|---|
| १. आईचा भाऊ | ------------- | (अ) आत्या |
| २. वडिलांची बहीण | ------------- | (आ) काका |
| ३. आईची बहीण | ------------- | (इ) मामा |
| ४. वडिलांचा भाऊ | ------------- | (ई) मावशी |

**प्र.२ पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहून चुकीची विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(अ) पिढी म्हणजे कुटुंबातील आधी असलेल्या व्यक्ती. [ ]

------------------------------------------------

(आ) वडिलांकडील सर्व नातेवाइकांची आडनावे एकच नसतात. [ ]

------------------------------------------------

(इ) वंशावळीच्या अभ्यासावरून कुटुंबांचा इतिहास समजत नाही. [ ]

------------------------------------------------

## प्र.३ ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| कधी भांडतो, कधी हसवतो, खेळताना मला रडवतो, मिळतो त्याला आईच्या हातचा छान खाऊ, तो आहे माझा<br>------------ | प्रेमाचे झाड मायेचे छत, तिच्याशिवाय मला नाही करमत, माझी माउली ती म्हणजे माझी<br>------------ | बाबांची बहीण माझे करते लाड, माझ्यासाठी आणते खेळणी, खाऊ गोड, ती म्हणजे माझी<br>------------ | आईचा भाऊ म्हणतो फिरायला जाऊ, हसवतो, खेळवतो खाऊ देतो हा म्हणून आवडतो मला. तो आहे माझा<br>------------ |

## प्र.४ तुमच्याशी असलेली नाती लिहा.

आईकडील नातेवाईक :------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

वडिलांकडील नातेवाईक :---------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

## प्र.५ खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) कुटुंब वंशावळीतून तुम्हांला कोणती माहिती मिळते ?

(आ) वंशावळ कशी तयार करतात ?

### उपक्रम

- आपल्या पालकांशी चर्चा करा. वडिलांकडील वंशावळीतील सदस्यांचे फोटो जमा करून त्याआधारे वंशवृक्ष तयार करा.
- तुमच्या आईकडील नातेवाइकांच्या आडनावांची पालकांच्या मदतीने यादी करा.

***



# ३. माझी शाळा



## शाळेला जातो आम्ही

लिहू, वाचू, अभ्यास करू
खेळू बागडू, व्यायाम करू
शहाणे होऊ आम्ही,
शाळेला जातो आम्ही।

गाणी गाऊ, नाटक बसवू
चित्रे काढू, नाच करू
हुशार होऊ आम्ही,
शाळेला जातो आम्ही।

मित्रांसंगे मस्ती करू
मोठे होऊ, नाव कमवू
देशाचे भविष्य आम्ही,
शाळेला जातो आम्ही॥



**ही आवडते मज मनापासुनी शाळा ।**
**लाविते लळा ही जसा माउली बाळा ॥**

शाळेचे क्रीडांगण रंगीबेरंगी पताकांनी सजवले होते. शाळेची वार्षिक क्रीडास्पर्धा सुरू होती. मुलांचा कलकलाट चालू होता. धावण्याच्या स्पर्धेत रोहित पहिला आला. रोहितचा प्रतिस्पर्धी मिहीरने रोहितचे अभिनंदन केले. त्यानंतर कबड्डीचे सामने सुरू झाले. त्यासाठी नीताचा संघ मैदानात उतरला होता. मुले ओरडून त्यांचा उत्साह वाढवत होती.



मुलींचा कबड्डीचा खेळ

**सांगा पाहू!**

* शाळेच्या क्रीडांगणावर तुम्ही कोणकोणते खेळ खेळता?

### शाळा म्हणजे काय?

शाळा म्हणजे अशी जागा जेथे आपण शिकायला जातो. जेथे आपण नियम पाळायला शिकतो.

शाळेत वेळेवर येणे, शाळेचा गणवेश घालणे, शालेय परिपाठासाठी रांगेत उभे राहणे यांतून आपण शिस्त शिकतो. शाळेत वेगवेगळ्या कुटुंबांमधील मुले-मुली शिकायला येतात. त्यांच्याशी आपले मैत्रीचे नाते असते. आपण आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत मिळूनमिसळून राहतो. एकमेकांना मदत करतो. एकमेकांची काळजी घेतो.

शिक्षकांविषयी आदर बाळगायला शिकतो. शाळेतील शिक्षक आपल्याला वेगवेगळे विषय शिकवतात. त्यांचे आणि आपले नाते शिक्षक-विद्यार्थी असे असते. समाजात कसे वागावे हे आपण शाळेत शिकतो. या सगळ्या शिक्षणातून आपण चांगले नागरिक बनतो. आपल्या जीवनात कुटुंबाप्रमाणे शाळेलाही महत्त्व असते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

शाळेच्या गणवेशाने विद्यार्थ्यांमध्ये समानता, शिस्त आणि एकता या भावना निर्माण होतात. शालेय गणवेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकीची भावना निर्माण होते. शाळेचा गणवेश हा त्या शाळेची ओळख असतो.

विनामूल्य वितरणासाठी

**खाली दिलेल्या चित्रांमध्ये शाळेसाठी आवश्यक साधने आहेत. ती ओळखा आणि चित्रांखाली त्यांची नावे लिहा.**

- **भौतिक घटक :** इमारत, फळा, खडू, डस्टर, बाके, घंटा, पुस्तके, वह्या, पेन्सिली, खोडरबर, सीसी टीव्ही-कॅमेरा, तक्रारपेटी, प्रयोगशाळा, मैदान, संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची सोय, मार्कर, व्हाईट बोर्ड, स्मार्ट बोर्ड, पाटी, रॅम्प, ग्रंथालय, परसबाग, संगणक कक्ष, प्रथमोपचार पेटी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, हॅन्डवॉश स्टेशन, स्कूल बस इत्यादी.



## माहीत आहे का तुम्हांला ?

शाळेमध्ये पायऱ्यांच्या शेजारी उताराचा पट्टा बांधलेला असतो. या उताऱ्याच्या पट्ट्याला 'रॅम्प' असे म्हणतात. रॅम्पमुळे दिव्यांगांना चाकांच्या खुर्चीवरून शाळेत ये-जा करणे शक्य होते.



- **मानवी घटक :** विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, कार्यालयीन काम करणारे कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, शालेय पोषण आहार स्वयंपाकी व मदतनीस इत्यादी.

विराजच्या शाळेत शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक होती. मुख्यमंत्री, शिस्तमंत्री, स्वच्छतामंत्री, अभ्यासमंत्री, सांस्कृतिकमंत्री आणि क्रीडामंत्री शालेय मंत्रिमंडळासाठी निवडले जाणार होते. सर्व विद्यार्थ्यांनी मतदान केले. विराजला सांस्कृतिकमंत्री म्हणून निवडले गेले. त्यामुळे आता शाळेत होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांची जबाबदारी त्याच्यावर असणार होती.



शालेय मंत्रिमंडळ निवडणूक

**कृती – शाळेत स्वच्छता सप्ताह साजरा करावयाचा आहे. तुमच्या वर्गाचे तीन गट तयार करून कामांची विभागणी खालील तक्त्यात करा.**

| गट 'अ' | गट 'ब' | गट 'क' |
|---|---|---|
| ---------------------------- | ---------------------------- | ---------------------------- |
| ---------------------------- | ---------------------------- | ---------------------------- |

- शाळेमध्ये विद्यार्थी शाळेची वेगवेगळी कामे करण्याची जबाबदारी घेतात.
- शाळा आपल्याला ज्ञान देते. समस्या सोडवायला शिकवते. एकत्र काम करायला शिकवते म्हणून शाळा ही समाजासाठी अतिशय उपयुक्त संस्था आहे.
- शाळेमध्ये प्रत्येकाला बोलण्याची, आपले विचार मांडण्याची आणि इतरांचे विचार, मत ऐकूण घेण्याची सवय लागते. शाळेत आपण लोकशाहीची मूल्ये शिकतो.

  अशाचप्रकारे आपल्या देशाचा कारभार चालतो. यालाच 'लोकशाही' असे म्हणतात.

## सांगा बरे!

✻ तुम्हांला तुमच्या शाळेतील कोणती जागा सर्वांत जास्त आवडते ? का ?

✻ जर तुम्हांला एक दिवस शिक्षक केले तर तुम्ही कोणती तयारी कराल ?

## करून पाहा.

निरंजनने नकाशा आराखडा काढला आहे.

तुम्ही स्वतःचे घर ते शाळा असाच नकाशा आराखडा काढा.



घर ते शाळा – नकाशा आराखडा

**शिक्षणाचा अधिकार :** भारत सरकारने 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम – २००९' लागू केला आहे. त्यानुसार भारतातील प्रत्येक मुला-मुलीला शिक्षणाचा अधिकार आहे.

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

## माहीत आहे का तुम्हांला ?



महात्मा जोतीराव फुले




सावित्रीबाई फुले

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षण मिळावे यासाठी खूप कष्ट घेतले. महात्मा जोतीराव फुले यांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुण्यात भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा होय. सुरुवातीला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे मुलींच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत. सावित्रीबाई फुले या पहिल्या भारतीय स्त्री शिक्षिका होत्या.

## स्वाध्याय

**प्र.१ यादी करा.**

तुम्हांला शाळेत आवडणाऱ्या गोष्टी

1. 
2. 
3. 
4. 
5. 

**प्र.२ खाली दिलेल्या घटकांचे पुढील तक्त्यात वर्गीकरण करून लिहा.**

(इमारत, शिक्षक, स्वच्छतागृह, मुख्याध्यापक, शालेय पोषण आहार स्वयंपाकी, ग्रंथालय, विद्यार्थी, प्रयोगशाळा, रॅम्प, पालक, मैदान, तक्रारपेटी, संगणक कक्ष)

| भौतिक घटक | मानवी घटक |
|---|---|
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |

**प्र.३ खालील कृती पूर्ण करा.**

**शाळेतील खालील व्यक्तींच्या कामांविषयी एका वाक्यात लिहा.**

| | |
|---|---|
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |



शालेय पोषण आहार स्वयंपाकी



वर्गशिक्षक

वर्गमित्र



पालक



मुख्याध्यापक



स्वच्छतामंत्री

## प्र.४ येथे तुम्ही काय करता?



वाचन कोपरा

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------



क्रीडांगण

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------




परसबाग

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## प्र.५ शाळेत शिकायला मिळणाऱ्या गोष्टी लिहा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

### उपक्रम

- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काय सुविधा असाव्यात? शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवून लिहा.
- शालेय अभ्यासासाठी तंत्रज्ञानाचा होणारा उपयोग यावर मित्रांबरोबर चर्चा करून तंत्रज्ञानाचे उपयोग लिहा.

***

# ४. बाजार




**बालआनंद मेळावा– मुले विविध वस्तू विकत आहेत, पालक खरेदी करत आहेत.**

विद्यार्थ्यांनी बालआनंद मेळाव्यात खरेदी–विक्रीसाठी लावलेली विविध वस्तूंची दुकाने म्हणजे बाजाराचे छोटे रूप होय. नेहा आणि सलील यांनी बालआनंद मेळाव्यामध्ये स्वत: तयार केलेली भेटकार्डे विकायला ठेवली होती. मेळावा संपल्यावर ते हिशोब करत होते.

“अरे सलील, आपल्याला जास्त पैसे मिळाले आणि फायदा झाला.” नेहा आनंदाने म्हणाली.

“पुढच्या वेळी आपण भेटकार्डांबरोबर पणत्या रंगवून विकायला ठेवू या.”

### सांगा पाहू!

- तुम्ही कधी बालआनंद मेळाव्यामध्ये सहभागी झाला आहात का? तुम्ही खरेदी केली की विक्री केली?
- बालआनंद मेळाव्यामध्ये तुम्हांला कोणत्या वस्तू विकायला आवडतील?

बाजार म्हणजे जेथे विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी–विक्री केली जाते, ते ठिकाण. वस्तूंची विक्री करणाऱ्याला 'विक्रेता' असे म्हणतात. वस्तू विकत घेणाऱ्याला किंवा खरेदी करणाऱ्याला 'ग्राहक' असे म्हणतात. बाजाराच्या ठिकाणी अनेक लोक एकत्र येतात.



## माहीत आहे का तुम्हांला?

बाजार अनेक प्रकारचा असतो. बाजार शहरातही असतो आणि गावातही असतो.




आपण अगोदर गावातील आठवडी बाजारात जाऊ या.

हा रघूच्या आणि रमाच्या गावचा बाजार. ते आई–वडिलांबरोबर बाजारात आले आहेत. हा आठवडी बाजार आहे. आठवडी बाजार म्हणजे आठवड्यात एका ठरावीक दिवशी भरणारा बाजार. येथील बाजार दर बुधवारी भरतो. गावातील लोक आठवडी बाजाराची उत्सुकतेने वाट बघत असतात. आसपासच्या गावातील शेतकरी शेतातील ताज्या भाज्या, धान्ये विकायला घेऊन येतात. अनेक कारागीर विविध वस्तू विक्रीसाठी घेऊन येतात. हल्ली शहरातही आठवडी बाजार भरतात. येथील ग्राहक आणि विक्रेते यांची एकमेकांशी चांगली ओळख झालेली असते. आठवडी बाजाराच्या निमित्ताने लोकांच्या एकमेकांशी गाठीभेटी होतात.



आठवडी बाजार

गावाजवळच्या मोकळ्या जागेत आठवडी बाजार भरला होता. बाजारात काही विक्रेते जमिनीवर पथाऱ्या पसरून बसले होते. काहींनी लाकडी बाकांवर तात्पुरते दुकान मांडले होते. हिरव्यागार पालेभाज्या, रंगीबेरंगी फुले, ताजी फळे, मसाल्याचे पदार्थ, कुरडया-पापड्या, शेव-फरसाण-मिठाई यांनी बाजार छान सजला होता. सुती पंचे, टोप्या, साड्या, मातीची आणि धातूंची भांडी, टोपल्या, शेतीची अवजारे अशा कितीतरी वस्तू विक्रीला ठेवल्या होत्या. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विक्रेते आपापल्या वस्तूंची ओरडून जाहिरात करत होते. काही ठिकाणी ग्राहक आणि विक्रेते यांच्यामध्ये वस्तूंच्या किमतीवरून घासाघीस सुरू होती. एकंदरीतच बाजारातील वातावरण उत्साहाचे आणि कोलाहलाने भरलेले होते.

बाबांनी सांगितल्याप्रमाणे रघूने, कोणकोणत्या वस्तू खरेदी करायच्या याची यादी घरूनच करून आणली होती.

**रमाने काही छोट्या आणि काही मोठ्या कापडी पिशव्या बरोबर घेतल्या होत्या.**

**विचार करा.**

**बाजारात जाताना नेहमी कापडी पिशव्या आपल्याबरोबर का ठेवाव्यात?**

दुसऱ्या दिवशी घरात काही जणांचा उपवास असल्यामुळे फळे घ्यायची होती. ताज्या फळांची गाडी बाजाराच्या सुरुवातीलाच होती. गाडीवर सगळी फळे छान रचली होती.

"नमस्ते काका. एक डझन केळी द्या." रघू म्हणाला.

"बाबा, पेरूही घेऊ या ना." हिरव्यागार पेरूंकडे बघत रमा म्हणाली.

"बरं! दादा, एक किलो पेरू द्या." बाबांनी एक डझन केळ्यांबरोबर एक किलो पेरू घेतले.

भाजी घेताना रमा म्हणाली, "बाबा कारली आणि शेपू सोडून काहीही घ्या."

तेव्हा रमाला समजावताना बाबा म्हणाले, "रमा, काही गोष्टी आवड म्हणून नाही, तर गरज म्हणून करायच्या असतात. आहाराच्या बाबतीतही तसेच आहे. प्रत्येक भाजीमध्ये विशिष्ट पोषणमूल्ये असतात. ती आपल्या शरीराला मिळायलाच हवीत ना? गोड, कडू, तुरट, खारट, आंबट आणि तिखट असे सगळे रस आपल्याला मिळायला हवेत, तरच आरोग्य चांगले राहील. तुझ्या आवडीची भेंडी आणि रघूला आवडणारा पालकही घेऊ आपण."

रघूने खरेदीच्या सामानाची यादी बघत बाबांना सांगितले, "बाबा, आता मनसुखलाल काकांच्या दुकानातून गोडीशेव आणि रेवड्या घ्यायच्या आहेत. आजीने वातींसाठी कापूस आणायला सांगितलाय. एक केरसुणीही घ्यायची आहे. शेजारच्या काकींना बाजारात यायला जमणार नव्हते म्हणून त्यांनी लोणच्यासाठी एक किलो मिरच्या आणायला सांगितल्या आहेत."

सगळी खरेदी झाल्यावर बाबांनी रमासाठी लाखेच्या लाल-हिरव्या बांगड्या आणि रघूसाठी भोवरा घेतला.

तेवढ्यात रमाला समोरच्या बाजूला रंगीत काचमण्यांनी भरलेल्या मोठ्या टोपल्या आणि पितळी घंटा दिसल्या. तेथे रमाची मैत्रीण वर्षा आणि तिचे आजोबा खरेदी करत होते.

"अगं त्यांचा गोठा आहे ना. त्यांच्या ढवळ्या-पवळ्या बैलांच्या आणि कपिला गाईच्या गळ्यातल्या माळांसाठी रंगीत मणी आणि घंटा घेत असतील ते. बैलपोळ्याला सजावटीसाठी लागतात." बाबा म्हणाले.



### माहीत आहे का तुम्हांला?



सांगोला येथील जनावरांचा आठवडी बाजार

बाजार जसा जीवनावश्यक वस्तूंचा असतो तसाच जनावरांचाही आठवडी बाजार असतो. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील आठवडी बाजार हा खिल्लार गाई-बैलांसाठी प्रसिद्ध आहे. या बाजारात गाई, बैल, म्हशी, शेळ्या-मेंढ्या असे स्वतंत्र विभाग केले आहेत. रविवार हा बाजाराचा दिवस असतो. खिल्लार बैलाला बैलगाडा शर्यतीसाठी सर्वाधिक मागणी असते. असेच बाजार अनेक गावांमध्येही भरतात.

उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याची सोय करण्याकरिता रघूला मातीचे भांडे हवे होते. मल्लप्पाच्या दुकानात मातीची भांडी छान मिळतात. तेथून एक मोठी परळ घेतली. परळ म्हणजे मातीचे पसरट भांडे. बाजारात बाबा, रघू आणि रमा यांनी उसाचा रस प्यायला. मग खरेदीने गच्च भरलेल्या पिशव्या घेऊन ते घरी आले. रमा आणि रघू यांनी मिळून खर्चाचा हिशोब लिहिला.

## सुपर मार्केट

आईबाबा कधीकधी सुपर मार्केटमध्ये जातात. जेथे एकाच दुकानात किराणा सामान, भाज्या, फळे, पाव-बिस्किटे, साबण, शाम्पू, सौंदर्यप्रसाधने, घरगुती वापराच्या वस्तू, स्टेशनरी अशा विविध उपयोगी गोष्टी विकल्या जातात त्या दुकानाला 'सुपर मार्केट' असे म्हणतात. साधारणत: असे सुपर मार्केट शहरी भागात असतात.



सुपर मार्केट

## शॉपिंग मॉल



शॉपिंग मॉल

हा एक प्रकारचा बाजारच असतो. मोठ्या शहरात अनेक मजली इमारतीमध्ये विविध प्रकारच्या वस्तूंची अनेक दुकाने असतात. ये-जा करण्यासाठी सरकते जिने, लिफ्ट असतात. मॉलमध्ये भाज्या-फळे-धान्ये यांबरोबर खेळणी, कपडे, फर्निचर, इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, घरगुती वापराच्या वस्तू असे सगळे असते.

लोकांना बसायला जागा असते. वेगवेगळ्या पदार्थांचे, पेयांचे स्टॉल्सही असतात. येथे सगळे काही एकाच छताखाली मिळते.

सर्व उत्पादनांवर किमतींचे स्टीकर्स असतात. खरेदी झाल्यावर पैसे देण्यासाठी किमतींच्या स्टीकर्सवरील बारकोड सिस्टीमचा उपयोग केला जातो. बारकोड स्कॅन करून किंमत बघितली जाते. खरेदीची पावती दिली जाते. खरेदी केलेल्या वस्तूंचे देयक रोख रक्कम देऊन किंवा ऑनलाईन पद्धतीने केले जाते.



### माहीत आहे का तुम्हांला ?

साधारणपणे बाजार म्हणजे जेथे रोज खरेदी-विक्री होते ते ठिकाण. एका ठरावीक दिवशी किंवा ठरावीक काळात भरणाऱ्या बाजाराला 'हाट' म्हणतात. त्यावरून 'बाजार-हाट' असा जोडशब्दही वापरला जातो. फक्त भांडी, फक्त कापड अशा एकाच प्रकारच्या वस्तू ज्या ठिकाणी विकल्या जातात, त्या बाजाराला 'गंज' म्हणतात. उदाहरणार्थ- कापडगंज.



### सांगा पाहू!

- तुमच्या घराजवळ कोणता बाजार आहे ? तुम्हांला बाजारात जायला आवडते का ?
- बाजार आपल्याला काय शिकवतो ?

## जागरूक ग्राहक बनू या.

वस्तूंमध्ये केली जाणारी भेसळ, वस्तूंची वाढवलेली किंमत, वजनमापातील फसवणूक इत्यादी प्रकारच्या फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक चळवळ अस्तित्वात आली. ग्राहकांनीही वस्तू खरेदी करताना वस्तूंचे योग्य मोजमाप, योग्य भाव याची खातरी करून घ्यावी.

जागो ग्राहक जागो

## स्वाध्याय

**प्र.१ नावे लिहा.**

(अ) वस्तूंची विक्री करणारा

(आ) वस्तूंची खरेदी करणारा

(इ) वस्तूंच्या खरेदी-विक्रीचे ठिकाण

**प्र.२ बाजारांचे प्रकार आणि त्यामधील विक्रीसाठीच्या वस्तू याचे संकल्पनाचित्र पूर्ण करा.**



**प्र.३ दुकानात खरेदी केलेल्या वस्तूचे पावती चित्र पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) दुकान कशाचे आहे ? ---------------

(२) पावतीमध्ये खरेदी केलेल्या वस्तूंची नावे लिहा. ---------------

(३) पावतीवरील खरेदी दिनांक लिहा. ---------------

(४) पावतीच्या आधारे विक्रेत्याला एकूण किती रुपये द्यावे लागतील ? ---------------

(५) विक्रेत्याने काही सूट दिली आहे का? दिली असल्यास किती रुपये ? ---------------

**वस्तू खरेदीचे करबीजक (टॅक्स इन्व्हॉईस)**

GSTIN : 27ABCDE1234S1Z

# टॉय एन जॉय

रंकाळा चौपाटी, कोल्हापूर ४१६०१२

मोबाईल – ९९९९००००० 

ईमेल: toynjoy@gmail.com

इन्व्हॉईस नं. : 25-26/099 

इन्व्हॉईस दिनांक : 1 जानेवारी-2026

| खेळणी | HSN क्र | करपात्र किंमत | GST | | | | करासह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | CGST Rate | | SGST Rate | | |
| | | | Rate | Tax | Rate | Tax | |
| बॅटरी ट्रेन | 9503 | ₹400 | 9% | 36 | 9% | 36 | ₹472 |
| ट्रायसिकल | 9504 | ₹300 | 6% | 18 | 6% | 18 | ₹336 |
| | | | | | | | |
| | | | एकूण किंमत | | | | ₹ 808 |

**प्र.४ खालील तक्ता पूर्ण करा. (उदा. ठिकाण आणि मिळणाऱ्या वस्तू)**

| आठवडी बाजार | सुपर मार्केट | शॉपिंग मॉल |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**प्र.५ असे का घडले असावे ते सकारण लिहा.**

(१) बाजारात जाताना रमाने कापडी पिशव्या बरोबर घेतल्या.

(२) काही गोष्टी आवड म्हणून नाही, तर गरज म्हणून करायच्या असतात, असे बाबा रमाला म्हणाले.

(३) विक्रेते आपापल्या वस्तूंची ओरडून जाहिरात करत होते.

(४) खरेदी करायच्या वस्तूंची यादी रघूने घरूनच करून आणली होती.

**प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) रमाच्या बाबांनी बाजारात कायकाय खरेदी केले ?

(२) वस्तू खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी, याचे सूचना पत्र तयार करा.

(३) बारकोड सिस्टीमचा वापर कशासाठी करतात ?

**उपक्रम**

- परिसरातील बाजाराला भेट देऊन तेथील घडामोडींची माहिती लिहा.
- तुमच्या परिसरातील जनावरांच्या बाजाराची माहिती जमा करून लिहा.
- सुपर मार्केट, शॉपिंग मॉल यांना भेटी देऊन तेथील अनुभव लिहा.

***



# ५. आपल्या गरजा व समस्या







**वरील चित्राचे निरीक्षण करा.**

माणसाला रोजच्या जगण्यासाठी अनेक गोष्टी आवश्यक असतात. पाणी व अन्न या दोन गोष्टी वरील चित्रात दिलेल्या आहेत. माणसाला जगण्यासाठी आणखी काय आवश्यक असते याचा विचार करा आणि वरील चौकोनात लिहा.

रोज सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तुम्ही काय करता ते आठवा. त्यासाठी तुम्हांला कोणत्या गोष्टी आवश्यक असतात त्याचा विचार करा. त्या गोष्टींना 'गरज' असे म्हणतात.

ज्या गोष्टींशिवाय माणसाचे जगणे कठीण होते, त्या गोष्टींना माणसाच्या 'मूलभूत गरजा' असे म्हणतात.

* **मूलभूत गरजा : अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण**



**विचार करा.**

**आपल्या घरी नळाला पाणी आलेच नाही, तर काय होईल?**



## गरजेच्या गोष्टी आणि आवडीच्या गोष्टी :

या दोन्हींमध्ये काही फरक आहे का?

होय! नक्कीच आहे. गरज म्हणजे अशा गोष्टी, ज्यांच्याशिवाय आपण जिवंत राहणे अवघड असते. उदाहरणार्थ, अन्न-पाण्याशिवाय आपण जगू शकत नाही. तर आवडीच्या गोष्टी आपले जीवन अधिक सुखकारक आणि आरामदायक करतात; पण आवडीच्या गोष्टी नसल्या तरीही जगणे शक्य असते.

**राजूला मिठाई खूप आवडते. तो रोज खूप मिठाई खातो. हे योग्य आहे का?**

सगळ्याच गरजेच्या गोष्टी आवडीच्या असू शकत नाहीत. तसेच सगळ्या आवडीच्या गोष्टी गरजेच्या असतीलच असे नाही.

थोडक्यात, गरजा या पूर्ण कराव्याच लागतात; पण आवडीला आवर घालणे शक्य असते.

**पुढीलपैकी गरज कोणती आणि आवड कोणती हे ठरवा. गरजेपुढच्या जागेत 'गरज' लिहा आणि आवडीपुढच्या जागेत 'आवड' लिहा.**

| | |
|---|---|
| १. धान्य ..................  | २. वेफर्स/ चॉकलेट ..................  |
| ३. शीतपेय ..................  | ४. घर ................  |
| ५. पाणी .................  | ६. खेळणी .................  |
| ७. कपडे ..................  | ८. पुस्तके .......................  |

## आता आपण आपल्या मूलभूत गरजांची माहिती घेऊ,

**पाणी :** पाण्यामुळे तहान भागते. पाणी हे माणसांप्रमाणेच पशुपक्ष्यांसाठी आणि वनस्पतींसाठीही आवश्यक आहे. पाणी मिळाले नाही, तर त्यांचेही जगणे अशक्य होते. म्हणूनच पाण्याला 'जीवन' असे म्हणतात.

पाऊस हा पाण्याचा मुख्य स्रोत असून पाणी ही सार्वजनिक संपत्ती आहे. त्यावर सर्वांचा हक्क असतो.



### करून पाहा.

तुमच्या घरी पाणी कोठून व कसे येते हे संकल्पनाचित्राच्या साहाय्याने खालील चौकटीत लिहा.

पाऊस

↓

मुख्य स्रोत

↓

.......................................................................

पाण्याचा स्रोत– विविध जलाशय

(नदी, धरण, विहीर, बंधारा, ओढा, झरा, कालवा इत्यादी.)

↓

.......................................................................

कोठे साठवले ?

(बंधारा, पाण्याची टाकी, विहीर इत्यादी.)

↓

.......................................................................

घरापर्यंत कसे आले ?

(विहीर, कूपनलिका, नळ, सार्वजनिक नळ कोंडाळे, जलशुद्धीकरण केंद्र इत्यादी.)

**अन्न :** माणसाला जगण्यासाठी पाण्याबरोबरच अन्नही आवश्यक असते. सर्वांना पुरेसे आणि सकस अन्न मिळायला हवे. तसेच अन्न वाया जाऊ नये ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.



### सांगा पाहू!

- तुम्ही दररोजच्या जेवणात कोणते अन्नपदार्थ खाता ?
- ते पदार्थ तुम्हांला कशापासून मिळतात ?
- घरात सर्वांना अन्न पुरेल याची काळजी कशी घ्यावी ?



**तुम्हांला वरीलपैकी कोणत्या ठिकाणी राहायला आवडेल ? का ?**

**हवा :** उत्तम आरोग्यासाठी 'शुद्ध हवा' ही महत्त्वाची गरज असते. शुद्ध हवेत केलेल्या श्वसनामुळे शरीर आणि मन निरोगी राहते. फुप्फुसांचे आरोग्य चांगले राहते. आपल्याला धावायला, पळायला, रोजची कामे करायला उत्साह येतो. कधी कधी हवेमध्ये वाहनांचा धूर, कारखान्यातील धूर, धुळीचे कण मिसळतात. यामुळे हवा अशुद्ध होते. त्यामुळे आपल्या आरोग्याला बाधा निर्माण होते.

**सांगा पाहू!**

- तुमच्या परिसरातील हवा शुद्ध आहे का ?
- हवा शुद्ध ठेवण्यासाठी कोणते उपाय केले जातात ?

**वस्त्र :** ऊन, वारा, पाऊस यांपासून शरीराचे रक्षण करण्यासाठी वस्त्राची आवश्यकता असते. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये आपण वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालतो. गरजेनुसार सर्वांनाच पुरेसे कपडे मिळणे आवश्यक आहे.

**निवारा :** सर्वांना सुरक्षित निवारा मिळणे आवश्यक आहे; कारण निवाऱ्यामुळे आपणाला संरक्षण मिळते. निवारा म्हणजे राहण्याची जागा. आपला निवारा म्हणजे आपले घर. आपण गावात राहतो की शहरात, आपण जेथे राहतो तेथील हवामान कसे आहे, तेथे कोणती साधने उपलब्ध आहेत यांवर आपले घर कसे असावे हे ठरते.




**आरोग्य :** चांगल्या सवयी, चांगला आहार यांमुळे आरोग्य चांगले राहते. नियमित व्यायाम आणि योग-प्राणायाम आपणास निरोगी राहण्यास मदत करते. आपले आरोग्य उत्तम असेल, तरच आपण रोजची कामे करू शकतो, स्वत:ची आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेऊ शकतो. विविध कारणांमुळे लोकांना आजार होऊ शकतात. अशा वेळी योग्य

उपचार आणि औषधे मिळणे आवश्यक असते. त्यासाठी गावांमध्ये प्राथमिक आरोग्यकेंद्रे असतात. शहरांमध्ये छोटे-मोठे दवाखाने असतात. सर्व लोकांना त्यांच्या गरजांनुसार औषधोपचार केले जातात.

**तुम्हांला काय वाटते?**
चांगले आरोग्य राखण्यासाठी काय करता येईल?

**शिक्षण :** समाजातील सर्वांसाठी 'शिक्षण' गरजेचे आहे. शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचावे म्हणून शासन विविध योजना आखते. शिक्षणामुळे आपणांस अनेक गोष्टी समजतात. शिक्षणामुळे विचार करणे, समस्या सोडवणे, नवीन गोष्टी तयार करणे इत्यादी गोष्टी साध्य होतात.

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजा आहेत. जीवन चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी प्रत्येकाच्या मूलभूत गरजा पूर्ण होणे आवश्यक असते.

**सांगा पाहू!**

- स्वत:चा, स्वत:च्या कुटुंबाचा, आपल्या परिसराचा विचार करा. त्यातून तुम्हांला आणखी काही गरजा जाणवतात का?
- शिक्षण व आरोग्य यांविषयी असलेले सुविचार सांगा.

**स्वच्छता कर्मचारी, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, पोलीस, सैनिक यांच्यामुळे आपल्या कोणत्या गरजा भागतात?**

**नैसर्गिक संसाधने :** संसाधने म्हणजे आपल्या सभोवतालचे असे सर्व घटक, जे आपणांस उपयोगी पडतात आणि ज्यांचा वापर करून आपण आपले जीवन अधिक चांगले करू शकतो.

गरजा पूर्ण करण्यासाठी साधनांची आवश्यकता असते. निसर्गातून मिळणाऱ्या आणि आपल्या परिसरात असणाऱ्या गोष्टींचा वापर आपण आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी करतो. त्या गोष्टींना 'नैसर्गिक संसाधने' असे म्हणतात. उदाहरणार्थ, पाणी या नैसर्गिक संसाधनाचा आपण काटकसरीने, जपून वापर केला पाहिजे.

मानवनिर्मित संसाधनांमध्ये पैसा, मालमत्ता, वाहतुकीची साधने, यंत्रे इत्यादींचा समावेश होतो.


चित्रातील मानवनिर्मित, निसर्गनिर्मित संसाधने ओळखा.

विनामूल्य वितरणासाठी

## आपल्या समस्या

आपण आपल्या गरजा समजून घेतल्या. आता आपण समस्या समजून घेणार आहोत. समस्या म्हणजे रोजच्या जीवनात येणाऱ्या अडचणी होय. माणसाला चांगल्या प्रकारे जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी सहज उपलब्ध न होणे म्हणजे समस्या होय.

जगनच्या गावात पाण्याची टंचाई आहे. पाण्याच्या टाकीत पाणी नाही. नद्या कोरड्या पडल्या आहेत. विहिरी आटल्या आहेत. धरणातील पाण्याची पातळी खालावली आहे. त्याच्या गावातील लोकांना रोजच्या वापरासाठीही पाणी मिळत नाही. त्याच्या गावामध्ये पुरेसे पाणी न मिळणे ही समस्या आहे.

अन्नटंचाई ही एक मोठी समस्या आहे. याची कारणे पुढीलप्रमाणे असू शकतात. उदाहणार्थ, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, शेतजमिनीचे कमी प्रमाण, महागाई, युद्ध इत्यादी.

### विचार करा.

तुमच्या परिसरात कोणकोणत्या समस्या आहेत? त्यावर कोणते उपाय करता येतील?









वरील चित्रांमध्ये तुम्हांला कोणकोणत्या समस्या दिसतात? त्या समस्यांमुळे आपल्या रोजच्या जीवनामध्ये कोणत्या अडचणी येतात?

## सामाजिक प्रश्न व सुविधा



जन्मत: आजारपणामुळे किंवा अपघातामुळे आपल्यापैकी काही व्यक्तींना शारीरिक दिव्यांगत्व येते. सार्वजनिक ठिकाणी वावरताना त्यांना अनेक अडचणींवर आणि गैरसोयींवर मात करावी लागते. त्यामुळे त्यांना विशेष सेवा-सुविधांची आणि मदतीची गरज असते.

### सांगा पाहू!

रस्त्यावरून एखादी दृष्टिहीन व्यक्ती चालली आहे. याप्रसंगी तुम्ही काय कराल?

पांढऱ्या काठीच्या मदतीने दृष्टिहीन व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी मोकळेपणाने वावरू शकतात. स्पर्शाच्या लिपीचा (ब्रेल लिपी) वापर करून ते लिहू-वाचू आणि गणिती क्रिया करू शकतात.




ब्रेल लिपी



### सांगा पाहू!

शाळेच्या पायऱ्यांच्या बाजूलाच एक उताराचा पट्टा (रॅम्प) कशासाठी आहे ?



जन्मत: किंवा अपघात झाल्यास काही वेळेला त्या व्यक्तीचा पाय निकामी होतो. अशा वेळी त्या व्यक्तीला जिना चढणे-उतरणे शक्य नसते. त्यासाठी रॅम्पचा उपयोग केला जातो. रॅम्पमुळे चाकांची खुर्ची वापरणाऱ्या व्यक्तींना इमारतीच्या आत येणे-जाणे शक्य होते. चाकांची खुर्ची वापरणाऱ्यांसाठी विशेष प्रकारच्या शौचालयांची सुविधाही काही ठिकाणी असते.

### सांगा पाहू!

सांकेतिक खुणांची भाषा तुम्हांला माहीत आहे का ?

कर्णबधिर व्यक्तींसाठी खुणांची भाषा असते. बोलणाऱ्यांच्या ओठांच्या हालचाली व हावभाव पाहून बोललेले समजून घेण्याचे तंत्र त्यांना माहीत असते. कर्णबधिरांसाठी सांकेतिक खुणांच्या विशेष बातम्या दूरदर्शनवर असतात.

दिव्यांग व्यक्तींना विनाअडथळा वातावरण तयार करून देणे आवश्यक असते. त्यांना शाळा, विविध कार्यालये, सार्वजनिक इमारती, आरोग्य केंद्रे, मनोरंजन केंद्रे इत्यादी ठिकाणी सहज वावरता येईल यासाठी विविध सुविधा देण्याचा प्रयत्न शासन करत असते.



सांकेतिक खुणांची भाषा

- **पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला दिलेल्या QR कोडमधील लिंकवरून सांकेतिक खुणांची भाषा समजून घ्या.**

## माहीत आहे का तुम्हांला?



**मुरलीकांत पेटकर :** हे मूळचे सांगलीचे राहाणारे. जर्मनी या देशातील हाईडलबर्ग येथे ऑगस्ट १९७२ मध्ये पॅराऑलिंपिक आयोजित केले होते. या स्पर्धेत त्यांनी विश्वविक्रम प्रस्थापित केला आणि आपल्या देशासाठी सुवर्णपदक पटकावले. त्यांना २०१८ साली 'पद्‌मश्री' या पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. मुरलीकांत पेटकर हे भारतीय सैन्यदलात होते. १९६५च्या भारत पाकिस्तान युद्‌धात गोळ्या लागून ते जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना अपंगत्व आले. तरीही त्यांनी मुष्टीयुद्‌ध, भालाफेक, गोळाफेक या खेळांतही विशेष प्रावीण्य मिळवलेले होते.



**शितलदेवी :** शितलदेवी या जम्मू-काश्मीर राज्यातील आहेत. त्यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी भरलेल्या अनेक स्पर्धांमध्ये 'तिरंदाजी' या खेळाच्या प्रकारात सुवर्णपदके मिळवलेली आहेत. त्यांच्या या विशेष कामगिरीसाठी भारत सरकारने त्यांना 'अर्जुन' पुरस्काराने सन्मानित केलेले आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून लिहा.**

(अ) पिण्यासाठी पाणी .............. येथे शुद्‌ध केले जाते.

(१) विंधन विहीर (२) जलशुद्‌धीकरण केंद्र

(३) पाण्याची टाकी (४) कारखाना

(आ) गावामध्ये औषधोपचार ................ या ठिकाणी मिळतात.

(१) ग्रामपंचायत (२) बँक

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र (४) शाळा

(इ) नैसर्गिक संसाधनांचा आपण ............... वापर केला पाहिजे.

(१) हवा तसा (२) भरपूर

(३) कधीकधी (४) काटकसरीने

**प्र.२ पुढील विधाने सकारण लिहा.**

(१) देशात कधीकधी अन्नटंचाई होऊ शकते.

(२) आपल्या आवडीला आवर घालणे आवश्यक असते.

(३) पाण्याला 'जीवन' असे म्हणतात.

**प्र.३ पुढे काही विधाने दिली आहेत ती वाचा. त्यामुळे होणारे फायदे लिहा.**

(१) अन्न वाया जाऊ न देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

(२) सर्वांना सुरक्षित निवारा मिळणे आवश्यक आहे.

(३) सर्वांचे आरोग्य उत्तम असणे गरजेचे असते.

(४) समाजातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे.

**प्र.४ खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.५ खालील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

(१) लग्नसमारंभात लोक अन्नाची नासाडी करत आहेत.

(२) दिव्यांग व्यक्ती रस्ता ओलांडत आहे.

(३) शेजारचा रमेश शाळेत नियमित जात नाही.

(४) कविता नेहमी आवडीने शीतपेय पिते.

**प्र.६ आंतरराष्ट्रीय योगदिन तुमच्या शाळेत कसा साजरा केला जातो? ते सांगा.**

### उपक्रम

- वेगवेगळ्या ऋतूंमध्ये कोणते कपडे वापरतात त्यांची चित्रे जमा करा व त्याखाली नावांची यादी लिहा.
- दिव्यांग व्यक्तींना शासनाकडून कोणत्या सुविधा मिळतात ते पालकांच्या मदतीने लिहा.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांत भारतातील दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.



२१ जून – आंतरराष्ट्रीय योगदिन

***



# ६. जलसाक्षरता



**थेंब थेंब पाण्याचा इथला**
**जमिनीत चला जिरवू या**
**जल म्हणजे खरी संपदा**
**धडा जलसाक्षरतेचा गिरवू या ॥**

जल म्हणजे पाणी. जलसाक्षरता म्हणजे पाण्याचे महत्त्व समजून घेणे, पाण्याची बचत करणे. जमिनीखाली असलेल्या पाण्याची पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.

संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथामध्ये पाण्याचे महत्त्व सांगताना म्हटले आहे,

**"नगरे चि रचावी। जलाशये निर्मावी।**
**महावने लावावी। नानाविधे॥"**



संत ज्ञानेश्वर

याचा अर्थ नगरे वसवताना जलाशय निर्माण करावेत. झाडे लावावीत; म्हणजे त्या नगरांना पाण्याची समस्या जाणवणार नाही.

आपल्याला जगण्यासाठी पाणी आवश्यक असते. पाण्याचा मुख्य स्रोत म्हणजे पाऊस होय. पावसाचे प्रमाण सगळीकडे सारखे नसते. पाऊस कोठे कमी, तर कोठे जास्त पडतो. मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पूर येतात तर काही ठिकाणी पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ पडतात. पाणी सर्वांनाच मिळावे म्हणून पाण्याचे नियोजन करावे लागते.

## माहीत आहे का तुम्हांला?

लातूर शहरात एकदा पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. त्या वेळी शासनामार्फत आगगाडीने पाणी नेऊन तेथे पाणीपुरवठा करण्यात आला होता.

भारतात दरवर्षी पाऊस पडण्याचा एक निश्चित काळ असतो. त्याला आपण 'पावसाळा' म्हणतो. पावसाचे पाणी अडवून उपयोगात आणण्यासाठी, साठवून ठेवण्यासाठी नदीवर धरण बांधले जाते. धरणातील पाण्याचे शुद्धीकरण करून ते नळांद्वारे लोकांपर्यंत पोहोचवले जाते.

## सांगा पाहू!

* पाण्याची बचत करण्यासाठी तुम्ही काय करता?

भारतामध्ये प्राचीन काळापासून जलव्यवस्थापनाला महत्त्व दिले गेले आहे. सिंधू संस्कृतीमध्ये घराच्या आवारात विहिरी होत्या. त्यांद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होत असे. पुढे गौतम बुद्धांच्या काळात भिक्खूंच्या निवासासाठी अनेक विहार खोदले गेले. प्रवासादरम्यान काही वेळ विश्रांतीसाठी आणि पावसाळ्यात काही दिवस राहण्यासाठी लेण्यांचा वापर होत असे. तेथे पावसाचे पाणी पिण्यासाठी साठवत. त्याला 'पाणपोढी' असे म्हणतात. महाराष्ट्रात जुन्नरच्या आसपास खोदलेल्या विहारांमध्ये अशा पाणपोढ्या आढळतात. सम्राट अशोक यांनी विहिरी खोदल्या होत्या आणि यात्रेकरूंसाठी पाण्याची सोय केली होती.



शिवनेरी किल्ल्यावरील पाणपोढी

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात शिखर शिंगणापूर हे ठिकाण आहे. येथे शंभुमहादेवाचे मंदिर असलेल्या डोंगरावर पाण्याची सोय नव्हती. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी तेथे एक मोठा तलाव बांधला.



शिखर शिंगणापूर येथील शिवतीर्थ तलाव



गंगासागर तलाव-रायगड किल्ला

'गडावरी आधी उदक पाहून किल्ला बांधावा' असे छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितले होते. म्हणजे जेथे पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकेल तेथेच किल्ला बांधावा. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर पाण्यासाठी लहानमोठे तलाव खोदवून घेतले. पावसाचे पाणी या तलावांमध्ये साठवले जाईल अशी सोय केली होती. जलाशयांची स्वच्छता राखावी आणि पाणी जपून वापरावे असेही त्यांनी सांगितले होते.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी विहिरी खोदल्या, तलाव-तळी निर्माण केली. त्यामुळे सर्वांसाठी पाण्याची सोय झाली. पाणपोया उभारून वाटसरूंची पाण्याची सोय केली. उदा, इगतपुरी येथील टोप बावडी, जेजुरी येथील मल्हार गौतमेश्वर तलाव इत्यादी



इगतपुरी येथील टोप बावडी



जेजुरी येथील गौतमेश्वर तलाव




**भूजलसंधारण :** घरांच्या छपरांवर, इमारतींच्या गच्चीवर, डोंगरमाथ्यांवर व जमिनीवर पावसाचे पाणी पडत असते. ते वाया न घालवता विशिष्ट पद्धतीने टाक्यांमध्ये साठवले जाते किंवा जमिनीमध्ये शोषखड्डे तयार करून त्यांत जिरवले जाते. यामुळे जमिनीमधील पाण्याची पातळी वाढते. पाण्याने विहिरी भरतात. जमिनीचा ओलावा टिकून राहतो. पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन केल्यामुळे जमिनीची धूप थांबते. झाडांच्या मुळांमुळे पाणी जमिनीत मुरायला मदत होते.



## माहीत आहे का तुम्हांला?

'वनराई' ही स्वयंसेवी संस्था माजी केंद्रिय मंत्री मोहन धारिया यांनी पुणे येथे स्थापना केली. या संस्थेद्वारे वनराई बंधारा बांधला जातो. हा कमी खर्चात बांधला जाणारा बंधारा आहे. ओढ्यात किंवा नाल्यात पाणी अडवून जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते. शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी याचा उपयोग होतो.

विनामूल्य वितरणासाठी

**पाण्याची बचत :** पृथ्वीवर गोड्या पाण्याचे स्रोत मर्यादित आहेत. पाऊस सगळीकडे सारखा पडत नाही. त्याचे प्रमाण प्रत्येक ठिकाणी कमी-अधिक असते. लोकसंख्या वाढते आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वाढत आहे. अशा वेळी पाण्याचा वापर काटकसरीने करणे आवश्यक आहे. त्याबरोबरच गोड्या पाण्याचे स्रोत स्वच्छ राखणे, जलप्रदूषण रोखणे आवश्यक आहे.



### माहीत आहे का तुम्हांला ?

**पाण्याचा पुनर्वापर काळाची गरज :** सातारा जिल्ह्यातील जकातवाडी येथे स्वच्छतागृहांमधून बाहेर पडणारे पाणी गाळून व शुद्धीकरण प्रक्रिया करून तेथील फळबागेसाठी, परसबागेसाठी तसेच स्वच्छतेसाठी पुन्हा वापरले जाते. यामुळे पाण्याचा पुन्हापुन्हा वापर करता येतो. पाण्याच्या पुनर्वापराची प्रक्रिया शहरांमधून अधिक प्रमाणात दिसून येते.



### विचार करा.

तुमच्या घरात वापरलेल्या पाण्याचा पुन्हा वापर कसा कराल ?

**पाणी वाचवण्याच्या चांगल्या सवयी–**

* आवश्यक असेल तेवढ्याच पाण्याचा वापर केला पाहिजे.
* नळ वाहते ठेवू नयेत. गळके नळ दुरुस्त करावेत.

जलशुद्धीकरण म्हणजे पाणी शुद्ध करणे. विविध कारणांमुळे पाणी प्रदूषित होते; म्हणजे त्यात अपायकारक घटक मिसळले जातात. प्रदूषित पाणी वैयक्तिक वापरासाठी, शेतीसाठी वापरले तर ते आरोग्यासाठी घातक ठरू शकते; म्हणून जलशुद्धीकरण करणे आवश्यक असते.



पाणी प्रदूषित होण्याची कारणे

## विचार करा.

* पाणी प्रदूषित होण्याची कारणे कोणती ?
* पाणी शुद्‌ध करण्याच्या पद्‌धती कोणत्या ?



डॉ. राजेंद्र सिंह

**वॉटरमॅन ऑफ इंडिया :** (भारताचे जलपुरुष) राजस्थानच्या मारवाड भागात पाऊस क्वचितच पडतो. लोकांना रोजच्या वापरासाठी, शेतीसाठी पाणी मिळत नाही. डॉ. राजेंद्र सिंह हे त्याच भागात लहानाचे मोठे झाले. त्यांनी पाण्यासाठी होणारी वणवण अनुभवली होती. त्यावर उपाय म्हणून त्यांनी 'जोहड' बांधायला सुरुवात केली. जोहड म्हणजे मातीचे बंधारे. या बंधाऱ्यांनी पावसाचे पाणी अडवले. त्यामुळे जिथे जोहड योजना राबवली गेली तो भाग हिरवागार झाला. या कामामुळे ते पुढे 'वॉटरमॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाऊ लागले.



अण्णा हजारे

महाराष्ट्र राज्यात अहिल्यानगर जिल्ह्यात राळेगण सिद्‌धी या गावात अण्णा हजारे आणि हिवरे बाजार या गावात पोपटराव पवार यांनी गावातील पाण्याची पातळी वाढावी म्हणून विविध प्रयत्न केलेले आहेत.



पोपटराव पवार

### माहीत आहे का तुम्हांला ?

* १० मे हा दिवस महाराष्ट्रामध्ये 'जलसंधारण दिवस' म्हणून साजरा केला जातो.

पाणी हा सजीवांसाठी महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच जलरक्षण आणि जलसंवर्धन ही सर्वांची जबाबदारी आहे. 'जलसाक्षर' होऊन पाण्याची बचत करावी.

## स्वाध्याय

**प्र.१ सकारण लिहा.**

(१) नदीवर धरण बांधतात.

(२) लातूर शहराला एकदा आगगाडीने पाणीपुरवठा करावा लागला.

(३) छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर पाण्याची व्यवस्था केली.

(४) डॉ. राजेंद्र सिंह यांनी जोहड बांधले.

**प्र.२ पुढील प्रश्नांची दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(१) तुमच्या परिसरातील पाणी प्रदूषित झाले आहे त्याबाबत पालकांसोबत चर्चा करून उपाययोजना लिहा.

(२) डॉ. राजेंद्र सिंह यांना 'वॉटरमॅन ऑफ इंडिया' का म्हणतात ?

**प्र.३ बाजूचे चित्र पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**




(१) चित्रातील वेष्टनावरून बाटलीत किती पाणी मावते ?

(२) सदर बाटलीची किंमत किती रुपये आहे ?

**प्र.४ भूजलसंधारणबाबतचा खालील उतारा वाचा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**भूजलसंधारण :** घरांच्या छपरांवर, इमारतींच्या गच्चीवर, डोंगरमाथ्यावर व जमिनीवर पावसाचे पाणी पडत असते. ते वाया न घालवता विशिष्ट पद्धतीने टाक्यांमध्ये साठवले जाते किंवा जमिनीमध्ये शोषखड्डे तयार करून त्यात जिरवले जाते. यामुळे जमिनीमधील पाण्याची पातळी वाढते. विहिरी भरतात. जमिनीचा ओलावा टिकून राहतो. पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन केल्यामुळे जमिनीची धूप थांबते. झाडांच्या मुळांमुळे पाणी जमिनीत धरून ठेवायला मदत होते.

(१) पावसाचे पाणी कोठेकोठे पडते ?

(२) जमिनीमधील पाण्याची पातळी कशामुळे वाढते ?

(३) पावसाचे पाणी जमिनीमध्ये जिरवण्यासाठी काय केले जाते ?

(४) या उताऱ्यावर आधारित दोन घोषवाक्ये तयार करून लिहा.

**उपक्रम**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाणी प्रश्नांसंदर्भात केलेल्या कार्याची माहिती शिक्षकांच्या मदतीने मिळवा.
- 'जलयुक्त शिवार योजना' आणि 'हर घर जल' या योजनांची पालकांच्या मदतीने माहिती मिळवून या योजनांचे फायदे थोडक्यात लिहा.



चवदार तळ्याचा सत्याग्रह

- परिसरात पडणारा पाऊस कसा मोजला जातो ? त्याचे उपकरण शिक्षकांच्या मदतीने पाहा.
- महाराष्ट्रातील धरणांची चित्रे गोळा करून चिकटवहीत चिकटवा.

***



# ७. भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक विविधता



**खालील चित्रात तुम्हाला आपल्या देशात कोणती विविधता दिसून येते ?**



## विविधतेतील एकता

आपला भारत देश हा विविध संस्कृतींनी नटलेला एक सुंदर देश आहे. आपल्या देशाला हजारो वर्षांचा इतिहास आहे.

भारतातील विविध भाषा, साहित्य, कला, उत्सव, धर्म हे सगळे भारतीय संस्कृतीचे घटक आहेत. भारताच्या विविध भागांमध्ये राहणारे आपण सगळे भारतीय आहोत.

### संस्कृती म्हणजे काय ?

संस्कृती म्हणजे समाजाची विशिष्ट जीवनपद्धती. त्यामध्ये त्या समाजाची भाषा, वेशभूषा, आहार, उत्सव, धर्म, पूजापद्धती, कला-कौशल्य, साहित्य, सण-समारंभ इत्यादी घटक समाविष्ट असतात.

### उत्सव :

भारताच्या विविध भागांमध्ये विविध उत्सव साजरे केले जातात. त्यांतील अनेक उत्सव हे शेतीशी आणि ऋतूंशी निगडित आहेत. शेती हा आपल्या देशातील मुख्य व्यवसाय आहे. यामुळे आपल्या देशाला 'कृषिप्रधान देश' म्हणतात.



भारतातील विविध उत्सव



बैलपोळा

बैलपोळा हा सण भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे. या सणाला बैलांची पूजा केली जाते. शेतकऱ्यांना शेतीकामात आणि इतर कामांतही बैलांची मोलाची मदत होते.

महाराष्ट्राबरोबरच आपल्या भारत देशात मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू इत्यादी राज्यांमध्येही बैलपोळा हा सण साजरा केला जातो. प्रत्येक राज्यामध्ये हा सण वेगवेगळ्या नावांनी, पद्धतींनी आणि वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो.

महाराष्ट्रामध्ये हा सण बैलपोळा या नावाने ओळखला जातो. मराठवाड्यात श्रावण महिन्याच्या अमावस्येला तर पश्चिम महाराष्ट्रात भाद्रपद महिन्याच्या अमावस्येला हा सण साजरा केला जातो. नागपूरसारख्या काही ठिकाणी 'मोठा पोळा' व दुसऱ्या दिवशी 'छोटा पोळा' असे दोन दिवस हा सण साजरा केला जातो. छत्तीसगड व मध्यप्रदेशमध्ये 'पोळा', कर्नाटकमध्ये 'बेंदूर किंवा भेंडी', तेलंगणा व आंध्र प्रदेशमध्ये 'इरुवाक पौर्णिमा', तमिळनाडूमध्ये 'मटटू पोंगल' अशा विविध नावांनी हा सण देशभर साजरा केला जातो. उत्तर आणि पश्चिम भारतात काही ठिकाणी या सणाला 'गोवर्धन किंवा गोधन' म्हणतात.

## जाणून घेऊ या.

बैलपोळा सण



- महाराष्ट्र – बैलपोळा / मोठा पोळा/ छोटा पोळा
- छत्तीसगड/ मध्यप्रदेश – पोळा
- उत्तर आणि पश्चिम भारत – गोवर्धन / गोधन
- कर्नाटक – बेंदूर / भेंडी
- तमिळनाडू – मटटू पोंगल
- तेलंगणा / आंध्र प्रदेश – इरुवाक पौर्णिमा

या सणाला घराला तोरण बांधून दारापुढे रांगोळी काढली जाते. बैलांना अंघोळी घालून स्वच्छ केले जाते, त्यांना रंगवले जाते. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेल्या झुली टाकतात. शिंगांना बेगड लावतात. डोक्यांना बाशिंगे, गळ्यांत कवड्यांच्या व घुंगरांच्या माळा घालतात. विविध वाद्ये वाजवून बैलांची गावातून शोभायात्रा काढली जाते. घरासमोर आल्यावर बैलांना ओवाळले जाते. त्यांची पूजा केली जाते व पुरणपोळीचा नैवेद्य देतात. त्या दिवशी दिवसभर बैलांना विश्रांती दिली जाते.

दिव्यांची आरास करून साजरी केली जाणारी 'दिवाळी' हा भारतातील एक मोठा सण आहे. दिवाळी हा कौटुंबिक एकोप्याचा आणि सार्वत्रिक आनंदाचा उत्सव आहे. गणेशोत्सव आणि दसरा हे सुद्धा हिंदू धर्मीयांचे मोठे सण आहेत.

बौद्ध धर्मीयांचा 'बुद्धपौर्णिमा' हा सण महत्त्वाचा असतो तर जैन धर्मीयांसाठी 'महावीर जयंती' आणि 'पर्युषण पर्वाला' महत्त्व आहे. 'ईद-उल-फित्र' म्हणजे रमजान ईद हा इस्लाम धर्मीयांचा मोठा सण आहे. 'नाताळ' किंवा 'ख्रिसमस' हा ख्रिस्ती लोकांचा सण आहे. पारशी धर्मीयांचा 'नवरोज', शीख धर्मीयांची 'गुरूनानक जयंती' हे सण आहेत. सण आणि उत्सव कोणत्याही धर्माचे असोत, सर्व भारतीय त्यात आनंदाने सहभागी होतात. एकमेकांना शुभेच्छा देतात.

**विविध धर्म आणि त्यांचे सण**

| धर्म | सण |
|---|---|
| हिंदू | दिवाळी, गणेशोत्सव, दसरा |
| बौद्ध | .............................. |
| जैन | महावीर जयंती, पर्युषण पर्व |
| इस्लाम | .............................. |
| ख्रिश्चन | नाताळ/ ख्रिसमस |
| पारशी | .............................. |
| शीख | गुरूनानक जयंती |

स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन हे राष्ट्रीय सण देशभर सर्व नागरिक मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

उत्सवामुळे लोक एकत्र येतात. त्यांच्यामध्ये एकतेची भावना निर्माण होते. उत्सवांमध्ये गाणी, नृत्य, रांगोळ्या, खेळ, शर्यती यांची रेलचेल असते. त्यामुळे कलांचा आनंदही घेता येतो. भारताच्या विविध भागांमध्ये गावागावात जत्रा भरतात. स्थानिक ग्रामदेवतांच्या उत्सवात, अनेक कारणांनी गावाबाहेर गेलेले लोक जत्रेला एकत्रित येतात.

## आहारातील विविधता

भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या आहारात विविधता आढळते. हवामान, पिके यातील फरक ही या विविधतेची कारणे आहेत. पंजाबी लोकांच्या आहारात प्रामुख्याने दाल-रोटी असते. किनारपट्टीवरचे लोक भात-मासे खातात. त्याचप्रमाणे काही प्रदेशांचे काही खास पदार्थ प्रसिद्ध आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील पुरणपोळी, दक्षिण भारतातील इडली सांबार इत्यादी.

## वेशभूषेतील विविधता



भारताच्या वेगवेगळ्या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांची वेशभूषा वेगवेगळी आहे. काश्मीरमधील आणि पंजाबमधील स्त्रिया सलवार-कमीज-दुपट्टा वापरतात. राजस्थानमधील स्त्रिया रंगीबेरंगी चोळी-घागरा आणि चुनरी वापरतात. नागालँड, मिझोराम अशा ईशान्येकडील डोंगराळ राज्यांमधील स्त्रिया पायघोळ झगे वापरतात. भारतामध्ये स्त्रियांच्या पोशाखात साडी विशेष प्रसिद्ध आहे.

पुरुषांच्या पोशाखातही विविधता दिसते. कोणी पायजमा घालतात, कोणी धोतर नेसतात, कोणी लुंगी नेसतात तर कोणी विजार घालतात. शर्ट, कुर्ता, झब्बा, सदरा, जाकीट किंवा कोट वापरतात. काही लोक डोक्यावर पागोटे घालतात. काही जण फेटे बांधतात. काही लोक टोप्या वापरतात. वेगवेगळ्या प्रदेशात फेट्यांचे आणि टोप्यांचे अनेक प्रकार बघायला मिळतात. लोक आजच्या काळात पारंपरिक वेषभूषांबरोबरच विविध प्रकारचे कपडे वापरतात.

## खेळ

भारतात अनेक प्रकारचे खेळ खेळले जातात. लगोरी, विटीदांडू, आट्यापाट्या, कुस्ती, कबड्डी तसेच फुगडी हे पारंपरिक खेळ आजही लोकप्रिय आहेत. मल्लखांब या खेळामुळे शरीर चपळ,

पिळदार होते आणि मनाची एकाग्रता वाढायला मदत होते. बुद्धिबळ हा बुद्धिचातुर्य वाढवणारा खेळ भारतात प्राचीन काळापासून खेळला जातो.

आपल्या जीवनात खेळांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण खेळामुळे एकजूट, सहकार्य हे गुण वाढतात. नेतृत्व या गुणाचा विकास होतो. खेळामध्ये हार-जीत यापेक्षा जिद्द आणि उत्साह महत्त्वाचा असतो. खेळामध्ये विशिष्ट नियम असतात. ते नियम खेळाडूंना पाळावेच लागतात.



### माहीत आहे का तुम्हांला?

कबड्डी या भारतीय खेळाला आता जागतिक मान्यता लाभली आहे. ढाका येथे झालेल्या जागतिक पातळीवरील कबड्डी स्पर्धेत भारताच्या महिला संघाने जेतेपद पटकावले.



जागतिक विश्वविजेता भारतीय कबड्डी महिला संघ २०२५



### माहीत आहे का तुम्हांला?



खाशाबा जाधव

- खाशाबा जाधव हे सातारा येथील राहणारे होते. ते भारतीय फ्रिस्टाईल कुस्तीगीर होते. त्यांनी १९५२च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते. स्वतंत्र भारताला ऑलिंपिक पदक मिळवून देणारे ते पहिले भारतीय होत.



कोनेरू हम्पी

- कोनेरू हम्पी या आंध्र प्रदेशच्या राहाणाऱ्या. त्या भारतातील सगळ्यांत कमी वयात ग्रँडमास्टर झालेल्या महिला होत. त्यांनी बुद्धिबळ या खेळामध्ये प्रावीण्य मिळवले आहे.



दिव्या देशमुख

- नागपूर येथील दिव्या देशमुख बुद्धिबळ हा खेळ खेळते. तिने २०२५मध्ये महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकला. दिव्या देशमुख हिने आशिया अजिंक्यपद स्पर्धा, जागतिक ज्युनिअर अंजिक्यपद स्पर्धा, युवा बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा यांमध्ये सुवर्णपदके जिंकली आहेत.

## लोककला

लोककला हा आपला सांस्कृतिक ठेवा आहे. या कलांमधून आपल्याला आनंद मिळतो. सहजतेने लोकशिक्षण मिळते आणि संस्कृती जपली जाते.

राष्ट्रसंत गाडगेबाबा आपल्या कीर्तनांतून लोकांच्या मनावर शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्त्व बिंबवत असत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि द. ना. गवाणकर यांनी आपल्या शाहिरीतून लोकजागृती केली.

संतांनी लोकांना समतेचा संदेश दिला. त्यांनी लोकांना दया, अहिंसा, परोपकार, सेवा, समता, बंधुभाव इत्यादी गुणांची शिकवण दिली. श्रीचक्रधर स्वामी, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा, संत नरहरी, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई शिऊरकर यांनी आपल्या कीर्तनातून, अभंगातून व भारुडातून लोकजागृती केली.

पंजाबचा भांगडा, कर्नाटकचे यक्षगान, गोव्याचे घोडेमोडणी नृत्य, नागालँड आणि मेघालय येथील बांबू नृत्य, गुजरातचा गरबा आणि दांडिया, राजस्थानचे घूमर नृत्य, आसामचे बिहू नृत्य, महाराष्ट्राचे लावणी नृत्य या कला म्हणजे त्या राज्याच्या विशेष ओळखी आहेत. विविध राज्यांमध्ये चित्रकला, शिल्पकला, वास्तूकला इत्यादींचेही विविध प्रकार आढळतात.

## महाराष्ट्रातील विविध लोककला


लावणी


पोवाडा


दशावतार


भजन, किर्तन


भारूड


गोंधळ


तमाशा


कोळीनृत्य



पंजाब – भांगडा



कर्नाटक – यक्षगान



गोवा – घोडेमोडणी नृत्य



नागालँड / मेघालय बांबू नृत्य



गुजरात – गरबा आणि दांडिया



राजस्थान – घूमर



आसाम – बिहू



महाराष्ट्र – लावणी

विविध राज्यांतील नृत्य

आपल्या देशात कला, आहार, भाषा, वेशभूषा, सण, परंपरा यांत विविधता आहे. असे असले तरी विविधतेतील एकता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे.



## स्वाध्याय

**प्र.१ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**






विनामूल्य वितरणासाठी

**प्र.२ राज्यापुढे तेथे साजरे केले जाणारे सण लिहा.**

| **राज्य** | **सण** |
| --- | --- |
| (१) महाराष्ट्र | ------------------------------------------------ |
| (२) आंध्र प्रदेश | ------------------------------------------------ |
| (३) तमिळनाडू | ------------------------------------------------ |
| (४) केरळ | ------------------------------------------------ |

**प्र.३ खालील तक्ता पूर्ण करा.**

| राज्य | पोशाख | आहार |
| --- | --- | --- |
| पंजाब | ---------------<br>--------------- | ---------------<br>--------------- |
| ---------------<br>--------------- | ---------------<br>--------------- | पुरणपोळी |
| राजस्थान | ---------------<br>--------------- | ---------------<br>--------------- |

**प्र.४ महाराष्ट्रात कोणकोणते खेळ खेळले जातात?**

(१) ----------------------------------------------------------------------------

(२) ----------------------------------------------------------------------------

(३) ----------------------------------------------------------------------------

(४) ----------------------------------------------------------------------------

**उपक्रम**

- घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्या साहाय्याने परिसरातील विविध लोककला, वेशभूषा, आहार, खेळ यांची चित्रांच्या साहाय्याने माहिती घ्या.
- महाराष्ट्रातील विविध लोककलांच्या संदर्भातील चित्रफिती आंतरजालाच्या मदतीने शोधा.

***





# ८. दळणवळण





**विद्यार्थ्यांनो, वरील चित्राचे निरीक्षण करा. तुम्ही पाहिलेली किंवा वापरलेली अशी वाहतुकीची साधने शोधा आणि चित्राजवळील चौकटीत ✓ अशी खूण करा.**

- पृथ्वीवर खूप लांबवर जाण्यासाठी वापरण्यात येणारे साधन ओळखा. त्याच्या बाजूच्या चौकटीत ◯ अशी खूण करा.
- उरलेली साधने तुम्ही कधी, कोठे पाहिली आहेत का? ती कोणत्या काळात वापरली असावीत असे तुम्हांला वाटते? त्याबद्दल तुमच्या मित्रांशी, शिक्षकांशी चर्चा करा.

वरील कृतीतून तुमच्या असे लक्षात येईल, की वेगवेगळ्या काळात आपण वाहतुकीसाठी विविध साधने वापरली आहेत. आपण आता वापरत असलेली साधने, पूर्वीच्या वाहतुकीच्या साधनांच्या तुलनेत जास्त वेगवान आणि सुरक्षित आहेत.

## वाहतूक

वाहतूक कशी होते ते आपण समजून घेऊ.



प्राचीन काळी माणूस वाहन म्हणून प्राण्यांचा उपयोग करत असे. पुढे चाकाचा शोध लागला. मग चाकांची गाडी करून ती ओढण्यासाठी तिला एखादा पाळीव प्राणी जुंपला जाऊ लागला. आजही काही ठिकाणी प्राण्यांनी ओढण्याच्या गाड्या वापरल्या जातात.



तंत्रज्ञानाचा विकास झाल्यावर प्राण्यांची जागा यंत्रांनी घेतली. यंत्रांच्या मदतीने चालणाऱ्या वाहनांमुळे प्रवास सोपा, सुखकर आणि वेगवान झाला.



### माहीत आहे का तुम्हांला ?



हॉवरक्राफ्ट– पाण्यात व जमिनीवर चालणारे वाहन



### करून पाहा.

**वाहतूक व दळणवळणाचे मार्ग**

- **जमिनीवरील मार्ग**
  - रस्ते मार्ग
  - रेल्वे मार्ग
- **जलमार्ग**
  - अंतर्गत
  - समुद्री
- **हवाईमार्ग**
  - देशांतर्गत हवाई मार्ग
  - आंतरराष्ट्रीय हवाई मार्ग

| रस्ते मार्ग | रेल्वे मार्ग | अंतर्गत | समुद्री | देशांतर्गत हवाई मार्ग | आंतरराष्ट्रीय हवाई मार्ग |
|---|---|---|---|---|---|
| ------- | ------- | -------- | -------- | -------- | ---------- |
| ------- | ------- | -------- | -------- | -------- | ---------- |
| ------- | ------- | -------- | -------- | -------- | ---------- |
| ------- | ------- | -------- | -------- | -------- | ---------- |

**खाली दिलेल्या वाहनांची नावे योग्य त्या रकान्यांमध्ये लिहा–**

बस, कार, हेलिकॉप्टर, फेरी बोट, रिक्षा, विमान, होडी, सायकल, मेट्रो, आगगाडी, तराफा, जहाज

**पुढील कृती पूर्ण करा.**

सिग्नलवरील पुढील रंगीत दिव्यांचा अर्थ लिहा.



(१) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(२) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

(३) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**रस्त्यावरील खुणा, चिन्हे आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
|  | **येथे वाहने लावू नयेत.** |
|  | **हॉर्न वाजवू नका.** |
|  | **गतिरोधक** |
|  | **कामगार काम करत आहे.** |
|  | **पुढे शाळा आहे.** |

**मालवाहतूक**

वस्तू, माल किंवा कच्चा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्याची प्रक्रिया म्हणजे मालवाहतूक होय. मोठमोठ्या सामानांपासून ते काचेच्या नाजूक सामानांपर्यंत वस्तूंची वाहतूक होत असते. ती आवश्यकतेनुसार ट्रक, रेल्वे, जहाज किंवा विमान या वाहनांमधून केली जाते. माल वाहून नेणाऱ्या आगगाडीला 'मालगाडी' असे म्हणतात.

मोठ्या शहरात पाणी, गॅस अशा गोष्टी पाईपद्‌वारेही वाहून नेल्या जातात.

**पालकांच्या मदतीने जाणून घेऊ या.**

- ज्या वाहनाला कोणतेही इंधन आवश्यक नाही असे कोणते वाहन आहे ?
- दुर्गम डोंगरी भागात प्रवासासाठी कोणत्या प्राण्यांचा उपयोग केला जातो ?




आधुनिक काळातील इलेक्ट्रिक (EV) वाहने



जेथे रस्ते बांधणे अवघड असते तेथे रोप-वेचा वापर केला जातो. जसे डोंगराळ आणि दुर्गम भागात किंवा खाणींमध्ये रोप-वेचा वापर केला जातो. उदा., रायगड रोप-वे



पूर्वी लोक प्रवासासाठी पालखीचा किंवा मेण्याचा उपयोग करत असत.



मेट्रो

## विचार करा.

तुम्हांला चंद्रपूरमधील ताडोबा व्याघ्र प्रकल्प बघायला जायचे आहे. तुम्ही तेथे दोन दिवस राहणार आहात. या प्रवासासाठी तुम्ही कशी तयारी कराल ?

- प्रवासास केव्हा निघणार ..............................
- प्रवासाची साधने ..............................
- प्रवासासाठी लागणारा वेळ ..............................
- प्रवासासाठी लागणारे साहित्य ..............................
- मार्गावरील प्रमुख ठिकाणे ..............................

## माहीत आहे का तुम्हांला?

- १६ एप्रिल, १८५३ या दिवशी भारतातली पहिली आगगाडी मुंबई ते ठाणे अशी धावली. ती कोळशावर चालणारी होती.
- भारतातील पहिली मेट्रो कोलकाता येथे सुरू झाली.
- महापुरासारखी परिस्थिती आली असता अन्य कोणत्याही प्रकारची वाहतुकीची साधने तेथे संपर्क साधू शकत नसतील, तर पॅराशुटच्या साहाय्याने संपर्क साधता येतो. पॅराशुटच्या मदतीने जीवनावश्यक वस्तू पोहोचवता येतात.



### संदेशवहन

माहितीची तसेच संदेशांची देवाणघेवाण करणे म्हणजे 'संदेशवहन' होय.

## विचार करा.

तुमचा मित्र दुसऱ्या गावाला राहत असेल आणि त्याच्या वाढदिवसानिमित्त त्याला शुभेच्छा द्यायच्या असतील, तर खालीलपैकी कोणता पर्याय तुम्हांला सहज शक्य आहे?

- लगेचच त्याच्या घरी जाणे.
- त्याला पोस्टाने पत्र किंवा भेटकार्ड पाठवणे.
- दूरध्वनीवरून त्याच्याशी संपर्क साधणे.
- त्याला मोबाईल फोनवरून शुभेच्छा संदेश पाठवणे.
- ई-मेल करणे.
- कबुतराच्या पायाला चिठ्ठी बांधून ते कबुतर त्याच्याकडे पाठवणे.

## माहीत आहे का तुम्हांला?

पूर्वीच्या काळी कबुतरांद्वारे संदेश पाठवले जात असत. त्यासाठी कबुतरे पाळून त्यांना प्रशिक्षण दिले जात असे. पूर्वीच्या काळी राजाचे दूत घोड्यावरून किंवा उंटावरून संदेशवहन करत असत. हे काम कष्टाचे आणि जोखमीचे असे. पुढे पोस्टसेवा सुरू झाली.

**पोस्ट :** पोस्टातून आपण देशभरात आणि परदेशातही पत्र, वस्तू पाठवू शकतो. महत्त्वाची पत्रे लवकरात लवकर पोहोचवण्यासाठी 'स्पीड पोस्ट' सुविधेचा वापर केला जातो. देश-परदेशात आपल्या वस्तू पाठवण्यासाठी बस, आगगाडी, जहाज आणि विमान इत्यादी वाहनांचाही उपयोग केला जातो.

**तुम्ही कधी पोस्ट ऑफिसमध्ये गेला आहात का? तेथे काय पाहिले ते सांगा.**

**टेलिफोन :** टेलिफोनच्या शोधामुळे जगात मोठी क्रांती झाली. दूरवर असणाऱ्या व्यक्तींना सहज संवाद करता येऊ लागला. जग जवळ आले. त्याचे अत्याधुनिक रूप म्हणजे 'मोबाईल फोन' होय.



ड्रोन

**संदेशवहनाची आणि माहिती प्रसारणाची अन्य साधने :**

रेडिओ, टी.व्ही, मासिके, वृत्तपत्रे, ड्रोन इत्यादींद्वारे संदेशवहन केले जाते. विविध प्रकारची माहिती दिली जाते.

## माहीत आहे का तुम्हांला ?

- पोस्टाची तिकिटे आपल्याला खूप माहिती देत असतात. त्यांच्यावर महत्वाच्या घटनांची आणि व्यक्तींची चित्रे छापलेली असतात. उदाहरणार्थ बिरसा मुंडा हे थोर क्रांतिकारक होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. त्यांचे हे तिकीट.




बिरसा मुंडा

- काही लोक पोस्टाच्या देशी-विदेशी तिकिटांचा संग्रह करतात.
- भारतातील पहिले पोस्ट ऑफिस १७७४ साली कोलकाता येथे सुरू झाले.
- भारतातील पहिली नागरी विमान वाहतूक कंपनी टाटा एअरलाईन्स ही मुंबईत १९३२ साली स्थापन झाली.
- जगभरात संदेशवहनासाठी उपग्रहांचा उपयोग केला जातो.



उपग्रह

## शोधा पाहू.

- टेलिफोनचा शोध कोणी लावला ?
- संगणकाचा शोध कोणी लावला ?

## स्वाध्याय

**प्र.१ नावे लिहा.**

(अ) रस्त्यावरून जाणारी वाहने ------------------------------------------------

(आ) जलमार्गाने जाणारी वाहने ------------------------------------------------

(इ) लोहमार्गावरून जाणारी वाहने ------------------------------------------------

(ई) हवाई मार्गाने जाणारी वाहने ------------------------------------------------

**प्र.२ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ योग्य पर्यायाभोवती गोल करा.**

(१) माल वाहून नेणारी आगगाडी – (मेट्रो, मालगाडी, लोकल ट्रेन)

(२) दुर्गम भागात व खाणीमध्ये वापरण्यात येणारा वाहन प्रकार – (मेणा, रिक्षा, रोप-वे)

(३) लवकरात लवकर पत्र पोचवण्याची सुविधा – (टपाल, स्पीड पोस्ट, टेलिग्राम)

(४) पूर्वीच्या काळी संदेश पाठवण्यासाठी वापरण्यात येणारा पक्षी – (गरुड, कबुतर, पोपट)

**प्र.४ पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला QR कोडमध्ये दिलेला महाराष्ट्राचा पर्यटन नकाशा समोर ठेवून तुमच्या राहत्या ठिकाणापासून तुमच्या आवडीचे कोणतेही पर्यटन स्थळ पाहण्यासाठी जायचे आहे.**

(१) कोणत्या वाहनांचा वापर कराल ?

(२) वाटेत कोणती मोठी गावे लागतील ?

(३) प्रामुख्याने तेथे काय पाहावयास मिळेल ?

**प्र.५ मोबाईल फोनविषयी वर्गात चर्चा करा. त्याचे फायदे व तोटे याविषयी माहिती लिहा.**

| फायदे | तोटे |
|---|---|
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ---------------------------------------- | ---------------------------------------- |

**उपक्रम**

- प्राचीन काळी वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांची चित्रे मिळवून, चिकटवहीत चिकटवून, नावे लिहा.
- सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत दिव्यांग व्यक्तींसाठी कोणत्या सुविधा असतात ? पालकांच्या मदतीने माहिती मिळवून लिहा.

***





# ९. ऐतिहासिक वास्तू



'जीवन शिक्षण विद्या मंदिर' शाळेत द्वितीय सत्र सुरू झाले. बाई वर्गात आल्या. त्यांनी मुलांना सुट्टीत काय केले ? हे विचारले. कोणकोण बाहेर गावी गेले होते याबद्दल विचारले. काही विद्यार्थ्यांनी हात वर केले. बाई म्हणाल्या, ''तुम्ही ज्या भागात गेला होतात तिथली लेणी, किल्ले, वाडे, थोरांची जन्मस्थाने, वस्तुसंग्रहालये, स्तंभ इत्यादी ऐतिहासिक वास्तूंचे फोटो मला मोबाईलवर पाठवा. पुढील आठवड्यात त्यांचे प्रदर्शन भरवू.''

### विचार करा.

**सुट्ट्यांमध्ये तुम्हांला कोणकोणते नवीन उपक्रम करता येतील ?**

बाई वर्गात आल्या आणि त्यांनी सर्वच विद्यार्थ्यांना डोळे बंद करायला सांगितले. कोणीही डोळे उघडायचे नाहीत, किलकिले करायचे नाहीत अशा सूचना देत बाईंनी वर्गातील फळ्यावर कागद चिकटवले. मुलांना कागद चिकटवण्याचा आवाज ऐकू आला. सूचना मिळताच त्यांनी डोळे उघडले. त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. विद्यार्थ्यांनी एका सुरात म्हटले 'व्वा! व्वा!'

समोर दोन-तीन मोठ्या कागदांवर मुलांनी सुट्टीत बघितलेल्या वास्तूंचे, वस्तूंचे फोटो होते. आपणच काढलेले फोटो पाहून मुले खूश झाली. बाई म्हणाल्या, "आता एकेकाने आपण काढलेल्या फोटोंची माहिती द्या. कोण अगोदर माहिती देईल ?"

### करून पाहा.

**तुम्ही भेट दिलेल्या ऐतिहासिक स्थळांच्या सहलींच्या फोटोंचा तक्ता तयार करा. तक्त्यांचे वर्गात प्रदर्शन भरवा.**

उमाने हात वर केला आणि ती म्हणाली, "बाई, मी आईवडिलांबरोबर **शिवनेरी** किल्ल्यावर गेले होते. शिवरायांचा जन्म ज्या किल्ल्यावर झाला, तेथे आईवडिलांनी मला गोष्ट सांगितली. शिवनेरीवर मी लेणी, पाणपोयी, शिवाई देवीचे मंदिर, तटबंदी, कडेलोट टोक, बुरूज पाहिले. मी कधीही विसरणार नाही ही सहल.''



छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान-शिवनेरी किल्ला



नंदीवर्धन (नगरधन) भुईकोट किल्ला



रामटेक येथील श्रीराम मंदिर

एवढ्यात नंदू उभा राहिला. तो म्हणाला, "मी विदर्भात **रामटेकला** गेलो होतो. रामटेक हे नागपूर जिल्ह्यातलं एक शहर आहे. रामटेकला प्रभू श्रीरामाचं मंदिर आहे. येथे रामनवमीला जत्रा भरते. महाकवी कालिदासांनी मेघदूत हे महाकाव्य इथे रचलं." रामटेक जवळ नंदीवर्धन (नगरधन) हा भुईकोट किल्ला आहे. सगळी मुले उत्सुकतेने बघत होती.



महात्मा फुले वाडा–विहीर

बाईंनी एक फोटो दाखवून विचारले, "या वाड्याला कोणी भेट दिली ?" गार्गीने हात वर केला. गार्गी सांगू लागली, "आम्ही सुट्टीत पुण्याला गेलो होतो. पुण्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचं घर पाहिलं. त्या घराच्या आवारात एक छोटी विहीर आहे. या विहिरीवर महात्मा फुलेंनी त्या काळी सर्व जाती–धर्मांच्या लोकांना पाणी भरण्याची परवानगी दिली होती. **फुले वाडा** महाराष्ट्र शासनानं वारसा स्थळ म्हणून घोषित केला आहे."

आई मला म्हणाली, "फुले दाम्पत्यामुळे आपण शिकलो बरं का. आईनं मला त्यांची गोष्ट सांगितली. मग आम्ही त्यांच्याच नावाचं '**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**' पाहिलं. विद्यापीठाचा परिसर बघताना तर दमूनच गेले. संग्रहालये, बागा, पुतळे, प्रयोगशाळा, ग्रंथालय, भुयारी मार्ग असं सगळं पाहिलं."

"तिथून पुढे आम्ही सेनापती बापट रस्त्यावरचं **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय** बघायला गेलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती अभ्यास केला आणि त्यामुळे ते कसे मोठे झाले

हे मला आईनं सांगितलं. या संग्रहालयात त्यांना मिळालेले 'भारतरत्न' पदक ठेवण्यात आलेलं आहे. ही नवीन माहिती मला मिळाली. तेथून जवळच असलेल्या, आपली पाठ्यपुस्तके जेथे तयार होतात त्या **'बालभारतीच्या'** वास्तूलाही आम्ही भेट दिली."




भारतरत्न पदक

जाफर म्हणाला, "मी बुलढाण्याला गेलो होतो. तिथे उल्कापातानं तयार झालेलं **'लोणार सरोवर'** मी पाहिलं. या सरोवराचं पाणी क्षारयुक्त असल्यामुळे ते प्यायचं नाही असं मला बाबांनी सांगितलं. मला आश्चर्यच वाटलं. येताना राजमाता जिजाऊ यांचं जन्मस्थान **सिंदखेड राजा** हे गाव पाहिलं."



लोणार सरोवर

फातिमा म्हणाली, "मी मुंबईला गेले होते. आयुष्यात प्रथमच समुद्र पाहिला. समुद्रकिनारी **'गेट वे ऑफ इंडिया'** ही वास्तू पाहिली."

अमृता म्हणाली, "मी कोकणात गेले होते. **'सिंधुदुर्ग'** हा जलदुर्ग पाहिला. हा किल्ला पाहण्यासाठी आम्हाला बोटीनं समुद्रातून प्रवास करावा लागला. बोट हेलकावे घेत होती. मी पहिल्यांदाच पाण्यातील किल्ला पाहिला. या किल्ल्यात गोड्या पाण्याची विहीर आहे.



सिंधुदुर्ग

पुढे आम्ही 'रोप-वे'च्या मदतीनं रायगडावर गेलो. रोप-वे पाहिला आणि त्यात बसलो. **'रायगड'** हा भव्य किल्ला आहे. या किल्ल्यावरच छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. स्वराज्याची राजधानी असणारा हा किल्ला मला खूप आवडला. या किल्ल्यावरच छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे."



किल्ले रायगड



### सांगा पाहू!

- तुम्ही भेट दिलेल्या ऐतिहासिक स्थळांची माहिती थोडक्यात सांगा.
- ऐतिहासिक स्थळाला भेट दिल्यावर तेथे कोणती काळजी घ्यावी?
- 'जागतिक वारसा स्थळ' यादीत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांची माहिती पालकांच्या मदतीने मिळवा व वर्गात सांगा.

बाई म्हणाल्या, "बघा बरं, किती गोष्टी आपल्याला कळल्या. जुन्या वास्तू बघणं, त्यांच्या विषयी जाणून घेणं, त्या स्थळाला भेट देणं म्हणजे वारसा सहल करणं. आज आपण केवळ फोटोंद्वारे वारसा सहल केली. अशा ऐतिहासिक ठिकाणी अनेक वारसा सहलीपण आयोजित केल्या जातात. सहलींमुळे जुन्या वस्तूंची आणि वास्तूंची खूप माहिती मिळते. तिथे आपण आवर्जून जायला हवं.

आपण त्या स्थळांची काळजी घ्यायला हवी, नाही का? या ऐतिहासिक वास्तूंवर आपण आपले नाव लिहू नये. तिथे कचरा टाकू नये. प्लॅस्टिकच्या बाटल्या फेकू नयेत. हा आपला वारसा आपण काळजीपूर्वक जपला पाहिजे."

**प्र.१ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

(१) **शिवनेरी**
- लेणी
- 
- 
- 
- 

(२) **सिंधुदुर्ग**
- जलदुर्ग
- 
- 

(३) **रायगड**
- शिवरायांचा राज्याभिषेक
- 
- 
- 

**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) रामटेक मंदिर | (अ) सिंदखेड राजा |
| (२) राजमाता जिजाऊ जन्मस्थान | (आ) सेनापती बापट रस्ता, पुणे |
| (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय | (इ) नागपूर |

**प्र.३ योग्य उत्तरे लिहा.**

(१) सावित्रीबाई फुले यांच्या नावाने असणारे विद्यापीठ – ____________

(२) पाठ्यपुस्तक निर्मिती केंद्र – ____________

**प्र.४ पुढील वाक्ये दुरुस्त करून लिहा.**

(१) सिंधुदुर्ग हा गिरीदुर्ग आहे.

(२) शिवनेरी किल्ल्यावर रोप–वे ने जावे लागते.

**प्र.५ कोणती काळजी घ्याल.**

| | | |
|---|---|---|
| | **ऐतिहासिक वास्तू** | कचरा टाकू नये. |
| | | |

**उपक्रम**

- तुमच्या परिसरातील ऐतिहासिक वास्तूंना भेटी देऊन त्याबद्दल माहिती लिहा.
- किल्ल्यांची चित्रे संकलित करून चिकटवहीत चिटकवा.
- महात्मा फुले यांच्या संदर्भातील किशोर मासिकातील गोष्टीसाठी पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला दिलेल्या QR कोडवरील लिंक पाहा.

***



# १०. गाथा : शौर्याची आणि क्रांतीची





छत्रपती शिवाजी महाराज



महात्मा जोतीराव फुले



सावित्रीबाई फुले



महाराजा सयाजीराव गायकवाड



राजर्षी शाहू महाराज



पंडिता रमाबाई



महर्षी धोंडो केशव कर्वे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. पंजाबराव देशमुख

**करून पाहा.**

चित्रांतील थोर व्यक्तींची माहिती आंतरजालाच्या मदतीने गोळा करा. यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे उदाहरण पुढे दिले आहे.

## कर्मवीर भाऊराव पाटील




'रयत शिक्षण संस्था' ही भारतातील एक जुनी आणि व्यापक प्रमाणावर काम करणारी शिक्षण संस्था आहे. या संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करून 'कमवा व शिका' या धर्तीवर योजना सुरू केली.

बाई वर्गात आल्या. सगळे विद्यार्थी उठून उभे राहिले. बाई म्हणाल्या, “आज मी तुम्हांला थोर व्यक्तींविषयी सांगणार आहे.

बाई सांगू लागल्या.

## शिरीषकुमार

इंग्रज सरकार भारतीयांवर अन्याय करत होते. इंग्रजांची राजवट भारतीयांचे शोषण करत होती. भारतीय जनतेने इंग्रजांविरुद्‌ध लढा उभारला होता. ‘जिंकू किंवा मरू’ ही घोषणा सर्वत्र दिली जात होती. १९४२ मध्ये महात्मा गांधीजी इंग्रजांना उद्‌देशून म्हणाले, ‘चले जाव’.


शिरीषकुमार

आपल्या देशात इंग्रजविरोधी वातावरण तापले होते. देशभर आंदोलन सुरू झाले. शाळकरी विद्यार्थीसुद्‌धा या आंदोलनात मागे नव्हते. खानदेशातील नंदुरबार येथील शिरीषकुमार या १६ वर्षांच्या विद्यार्थ्याने इंग्रजांच्या विरोधात मिरवणूक काढण्याचे ठरवले. तो आणि त्याचे सहकारी शशिधर, लालदास, घनश्याम आणि धनसुखलाल यांनी इंग्रजांविरुद्‌ध मोर्चा काढला. नंदुरबार येथील झेंडा चौकात शालेय विद्यार्थी अग्रभागी असलेली ही मिरवणूक शांततापूर्ण मार्गाने चालली होती. पोलिसांनी शिरीषकुमार व त्याचे मित्र यांना मिरवणूक विसर्जित करण्याचा आदेश दिला. शिरीषकुमार आणि त्याच्या सवंगड्यांनी हा आदेश ऐकला नाही. ९ सप्टेंबर, १९४२ रोजी या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. या गोळीबारात हे विद्यार्थी आपल्या देशासाठी हुतात्मा झाले.

### शोधा पाहू.

वस्ताद लहुजी साळवे, राजगुरू आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याची माहिती देणारी पुस्तके शोधा व वाचा.

## शांती घोष, सुनीती चौधरी


शांती घोष


सुनीती चौधरी

गोष्ट बंगालमधील दोन शाळकरी मुलींची. शांती घोष आणि सुनीती चौधरी यांची. त्या दोघी वर्गमैत्रिणी होत्या. शांती यांचे वडील देवेंद्रनाथ प्राध्यापक होते. त्यांनी आपल्या मुलीवर देशभक्तीचे संस्कार केले. शाळकरी वयातील शांतीला एवढेच कळले की इंग्रज आपले शत्रू आहेत, त्यांना हरवून आपण स्वातंत्र्य मिळवायला हवे. १९३१ मध्ये या दोघींना नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे भाषण ऐकायला मिळाले. त्या भारावून गेल्या. शांती घोष यांनी त्यांच्या वहीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांची स्वाक्षरी घेतली.

पुढे त्या 'युगांतर' या क्रांतिकारक संघटनेत काम करू लागल्या. याच काळात बंगालमधील कोमिल्ला भागाचा इंग्रज अधिकारी स्टीव्हन्स भारतीयांवर अत्याचार करत होता. मिरवणूक काढणाऱ्या लोकांवर लाठीमार करत होता. लोकांची डोकी फुटेपर्यंत मारहाण करायचा. आपण त्याचा अन्याय सहन करायचा नाही. या दुष्ट इंग्रज अधिकाऱ्याला धडा शिकवायचा असे त्या दोघींनी ठरवले.

स्टीव्हन्सला जीवाची भीती होती. त्याने स्वतःच्या घरीच कार्यालय थाटले होते. घराभोवती पहारा ठेवला होता. नागरिकांना त्याला भेटता येत नव्हते. त्याला भेटायला जाण्याचा निर्धार या दोघींनी केला. दोघींनाही पिस्तूल चालवण्याचे शिक्षण देण्यात आले होते. दोघी न घाबरता स्टीव्हन्सच्या घरी गेल्या. तो स्वतः त्या दोघींना भेटण्यासाठी बाहेर आला. बोलणे झाल्यावर सुनीतीने लपवून आणलेले पिस्तूल काढले, त्याच्यावर गोळ्या झाडल्या. तो जागेवरच कोसळला. दोघींना पकडण्यात आले, त्यांना जन्मठेप झाली. पुढे १९३९ मध्ये त्यांची सुटका झाली.

## जाणून घेऊ या.

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी भारत जिंकून घेतल्यावर महाराष्ट्रात आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा उभारला. उमाजींनी इंग्रजांविरुद्ध लढा देण्याचे व इंग्रजांची सत्ता उलथवून टाकण्याचे आवाहन केले. पुणे, सातारा, अहिल्यानगर इत्यादी भागांत त्यांचे कार्य पसरले.

पुढे त्यांचा वारसा क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू यांनी चालवला. चापेकर बंधूंपासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी स्वातंत्र्याचा लढा उभारला.

## माहीत आहे का तुम्हांला ?

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे या गावातील बाबू गेनू सैद हा तरुण. ते मुंबईतील कापडगिरणीमध्ये काम करत होते. १९३० मध्ये मुंबईत परदेशी मालावर बहिष्कार आंदोलन सुरू होते. या आंदोलनात बाबू गेनू आघाडीवर होते. एकदा एका मालवाहू मोटारीतून परदेशी कापड नेले जात होते. त्या वेळी बाबू गेनू हातात तिरंगा ध्वज घेऊन त्या मालवाहू मोटारीसमोर आडवे झाले. मोटार चालवणाऱ्याने गाडी तशीच बाबू गेनूच्या अंगावरून नेली. त्यांनी देशासाठी हौतात्म्य पत्करले.



बाबू गेनू सैद

### जाणून घेऊ या.



संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद
यांना भारतीय संविधानाचा मसुदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान समितीची स्थापना डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या नेतृत्वाखाली झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर २१ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची स्थापना झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली संविधानाचा अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीकडे सादर करण्यात आला; २६ जानेवारी १९५०पासून संविधान अमलात आले. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो.

## स्वाध्याय

**प्र.१ पुढे दिलेल्या व्यक्तींशी संबंधित ठिकाणांची नावे कंसात दिलेली आहेत. ती त्यांच्या नावांपुढे लिहा.** (नंदुरबार, कोमिल्ला, पुणे, महाळुंगे)

(१) बाबू गेनू सैद ..........................

(२) शिरीषकुमार ..........................

(३) स्टीव्हन्स ..........................

(४) आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक ..........................

**प्र.२ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) शिरीषकुमार यांनी इंग्रजांविरुद्ध काढलेल्या मोर्चात कोणकोण सहभागी झाले होते ?

(२) शांती घोष आणि सुनीती चौधरी या कोणत्या क्रांतिकारक संघटनेत काम करत होत्या ?

(३) रयत शिक्षण संस्था कोणी स्थापन केली ?

**प्र.३ लिहा पाहू.**

(१) गांधीजींनी इंग्रजांविरुद्ध दिलेली घोषणा –

(२) शांती घोष यांच्यावर देशभक्तीचे संस्कार करणारे –

(३) चापेकर बंधूंपासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्याचा लढा उभारणारे –

(४) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या योजनेचे स्वरूप –

**प्र.४ नावे लिहा.**

(१) डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली समिती ..............................

(२) मसुदा समितीचे अध्यक्ष ..............................................................

**प्र.५ तीन–चार वाक्यांत माहिती लिहा.**

(१) शिरीषकुमार

(२) बाबू गेनू सैद

**उपक्रम**

- तुमच्या शाळेत कोणकोणत्या थोर व्यक्तींचे फोटो आहेत त्यांची यादी करा.
- भारतीय स्वातंत्र्यचळवळीमध्ये भाग घेतलेल्या स्त्रियांची माहिती मिळवून यादी तयार करा.
- तुमच्या परिसरातील थोर व्यक्तींच्या जीवनातील एक प्रेरणादायी प्रसंग निवडून तो लिहा. शक्य झाल्यास त्या व्यक्तीचे चित्र चिकटवा.

***



# ११. पर्यावरण रक्षण : माझी जबाबदारी





महात्मा गांधी जयंती साजरी करण्यासाठी सर्व विद्यार्थी २ ऑक्टोबर रोजी मैदानात उपस्थित होते. मुख्याध्यापिकांच्या सूचनेनुसार शालेय स्वच्छता मोहीम सुरू झाली. विनय स्वच्छ, नीटनेटके कपडे घालून पहिल्या रांगेत उभा होता. विनयला तसा कामाचा कंटाळाच. तो पोटाला हात लावून पोटदुखीचे नाटक करून बाजूला जाऊन बसला. मुख्याध्यापिकांनी विनयचे स्वच्छतेत सहभाग न घेण्याचे कारण ओळखले. त्यांनी विनयला आपल्या ऑफिसमध्ये बोलावून घेऊन स्वतःजवळ बसवले. त्याला काही चित्रकार्डे दाखवून प्रश्न विचारले. विनय चित्रांचे निरीक्षण करू लागला.

**करून पाहा.**

**चित्रांचा योग्य क्रम लावा.**













### सांगा पाहू!

सर्व लोक आनंदाने फूटपाथवरून का जाऊ लागले?

विनयने मुख्याध्यापिकांना प्रश्न विचारला, "स्वच्छता म्हणजे काय आणि ती का करायची?"

मुख्याध्यापिका बोलू लागल्या, "स्वच्छता म्हणजे आरोग्य राखण्यासाठी व रोगराई वाढू नये यासाठी घ्यायची काळजी. यासाठी स्वतःची, सार्वजनिक ठिकाणांची व पर्यावरणाची स्वच्छता राखणं महत्त्वाचं असतं. वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच, घर व परिसर स्वच्छतेमध्ये कचरा योग्य ठिकाणी टाकणं, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणं या गोष्टींचा समावेश होतो. त्यामुळे सगळीकडे स्वच्छता दिसून येते. स्वच्छतेमुळे सगळीकडे आनंददायी व प्रसन्न वातावरण राहतं."

### विचार करा व सांगा.

- शरीराची स्वच्छता नियमितपणे केली नाही तर काय होईल?
- परिसरात कचरा व दुर्गंधी असेल तर काय होईल?
- आपले घर, शाळा, परिसर, गाव व शहर यांची स्वच्छता कोण करते?

विनयच्या डोक्यात अनेक प्रश्न आले होते. विनयने बोलायला सुरुवात केली. "आपण दरवर्षी २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबवतो. मग त्याआधी स्वच्छतेला महत्त्व नव्हतं का? स्वच्छतेसाठी कोणीच काम केलं नाही का?" मुख्याध्यापिका विनयला स्वच्छतेबाबत सांगू लागल्या.

### माहीत आहे का तुम्हांला?

आपल्या भारतात स्वच्छतेची परंपरा खूप जुनी आहे. पूर्वीच्या लोकांनाही स्वच्छता महत्त्वाची वाटत असे. हजारो वर्षांपूर्वी भारतात मोहेंजोदडो आणि हडप्पा अशी सुंदर शहरे होती. या खूप जुन्या काळातील शहरांत उत्तम रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था आणि सार्वजनिक स्नानगृहे होती. लोक घरे, रस्ते आणि पाण्याच्या जागा स्वच्छ ठेवत.



## माहीत आहे का तुम्हांला?



राष्ट्रसंत गाडगेबाबा

राष्ट्रसंत गाडगेबाबांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. त्यांचे नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर फाटकीतुटकी गोधडी आणि हातात एक गाडगे असा त्यांचा वेश असायचा. त्यामुळेच लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव झाडून स्वच्छ करत. महाराष्ट्र राज्यात, 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' राबवले जाते. या अभियानात शुद्‌ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी, घराची, स्वतःची आणि परिसराची स्वच्छता तसेच सांडपाण्याचे नियोजन, कचऱ्याची विल्हेवाट इत्यादी गोष्टी करणे अपेक्षित आहे.

"स्वच्छतेची सुरुवात ही स्वतःच्या स्वच्छतेपासून होते. त्याचबरोबर परिसराची व सार्वजनिक ठिकाणांचीही स्वच्छता तितकीच महत्त्वाची असते. स्वतःची व परिसराची स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीची आहे."

बाहेर सर्व विद्यार्थी परिसर स्वच्छता करत होते. काही मुले मैदानातील वाढलेले गवत काढत होती, तर काही मुले झाडांचा पालापाचोळा गोळा करत होती. हे पाहून विनय म्हणाला, "आपल्या मैदानात खूप झाडं आहेत. मोठ्या झाडांचा पालापाचोळा पडून त्याचा कचरा होतो. आपण त्याचं खत तयार करतो."

मुख्याध्यापिका म्हणाल्या, "आपण दरवर्षी जून महिन्यात वृक्षारोपण करतो." विनय म्हणाला, "बाई, वृक्षारोपण म्हणजे काय हो?" बाई म्हणाल्या, "वृक्षारोपण म्हणजे नवीन झाडं लावणं. यावर्षी तू कुठे आणि किती नवीन झाडं लावलीस?" विनय म्हणाला, "मी घराच्या परसबागेत दोन झाडं लावली."



### सांगा पाहू!

- वर्षभर हिरवीगार राहणारी झाडे कोणती?
- झाडे नसती तर काय झाले असते?



### करून पाहा.

- लाजाळूच्या रोपाच्या पानांना हळूच स्पर्श करून पाहा.
- एका कुंडीत रोप लावून त्याचे निरिक्षण करा.

मुख्याध्यापिका बोलू लागल्या, "झाडांमध्येही जीव असतो. त्यांना जगण्यासाठी पाणी, हवा व सूर्यप्रकाश यांची गरज असते. डॉ. जगदीशचंद्र बोस या भारतीय शास्त्रज्ञांनी जगात पहिल्यांदा सिद्‌ध करून दाखवलं, की झाडांनाही आपल्यासारख्या संवेदना असतात. म्हणजे त्यांना आनंद होतो, दुःख होतं, थंडी-ऊन जाणवतं आणि त्यांना स्पर्श केल्याचंही कळतं."

आपण नवीन झाडे लावायला हवीत, ती जगवायला हवीत. वृक्षतोड थांबवायला हवी कारण झाडे आपल्याला खूप काही देतात.

## विचार करा आणि लिहा.



झाड आपल्याला काय देते ?

-----------------------------

-----------------------------

-----------------------------



आपण झाडाला काय देतो ?

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

## माहीत आहे का तुम्हांला ?

- **चिपको आंदोलन १९७३ :** जंगल वाचवण्याचा लढा. हिमालयाच्या पायथ्याशी मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जाणार होती. या विरोधात चंडिप्रसाद भट्ट व सुंदरलाल बहुगुणा यांनी आंदोलन केले. झाडे तोडली जाऊ नयेत म्हणून स्त्रियांनी झाडांना मिठी मारून त्यांचा बचाव केला.
- दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.

## जाणून घेऊ या.

'देवराई' म्हणजे देवाच्या नावाने राखलेले पवित्र जंगल. देवराया नैसर्गिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाच्या आहेत. जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे जतन करणे आवश्यक आहे. येथील झाडे तोडण्यास मनाई असते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील पेमगिरी किल्ल्याच्या परिसरात एक मोठे वडाचे झाड आहे. हे झाड 'महावटवृक्ष' म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्र राज्यातील हे सर्वांत मोठे झाड आहे असे मानले जाते. लोकसहभागातून हे झाड जपले गेले आहे. स्वराज्यसंकल्पक शहाजीराजे यांनी पेमगिरी किल्ल्यावर स्वराज्य स्थापण्याचा प्रयत्न केला होता.



महावटवृक्ष–पेमगिरी

**सालुमरदा थिमक्का :** या कर्नाटकातील पर्यावरणवादी कार्यकर्त्या होत. त्यांनी वयाची शंभरी ओलांडली. सालुमरदा म्हणजे झाडांची रांग. त्यांनी सुरुवातीला ३८५ वडाची झाडे लावली. त्यांच्या वाढीकडे नीट लक्ष दिले. पुढे त्यांनी पिंपळ, उंबर यांसारखी हजारो झाडे लावली. झाडे हीच आपली मुले आहेत असे त्या सांगत असत. भारत सरकारने त्यांना वृक्षारोपण कार्यासाठी 'पद्‌मश्री' हा सन्मान दिला.


सालुमरदा थिमक्का


संत तुकाराम

संत तुकारामांनी अभंगात म्हटले आहे.

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।
पक्षीही सुस्वरे आळविती।।"

मुख्याध्यापिका विनयशी बोलतच इयत्ता चौथीच्या वर्गात गेल्या. तेथील इयत्ता चौथीचे पुस्तक काढून त्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे 'आज्ञापत्र' दाखवत विनयला म्हणाल्या, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून वृक्षसंवर्धनासाठीचं धोरण सांगितलं गेलं आहे. झाडांमुळे हवा शुद्‌ध राहते, जमिनीची धूप थांबण्यास मदत होते, प्रदूषण कमी होतं, पावसाचं पाणी अडवलं जातं. आपल्याला फळं, भाज्या, औषधी वनस्पती, लाकूड अशा अनेक गोष्टी मिळतात. तसंच विविध प्राण्यांसाठी व पक्ष्यांसाठी निवारा मिळतो. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे."

हे सर्व ऐकून विनय म्हणाला, "मी स्वच्छतेचं काम करायला टाळाटाळ करायचो, पण आता मला स्वच्छतेचं महत्त्व समजलं आहे. त्याचबरोबर वृक्षारोपणाचे फायदेही समजले. यापुढे मी वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच परिसर स्वच्छता व वृक्षारोपण या कामांमध्ये सगळ्यांत पुढे असेन."



## स्वाध्याय

**प्र.१ योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण करा.**

(१) २ ऑक्टोबर रोजी ________________ यांची जयंती साजरी केली जाते.

(२) हजारो वर्षांपूर्वी भारतात मोहेंजोदडो आणि ________________ अशी सुंदर शहरे होती.

(३) राष्ट्रसंत गाडगेबाबांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील ________________ येथे झाला.

(४) भारत सरकारने ________________ यांना वृक्षारोपणासाठी पद्‌मश्री सन्मान दिला.

**प्र.२ खालील तक्ता पूर्ण करा.**

स्वच्छता

| वैयक्तिक स्वच्छता | सार्वजनिक स्वच्छता |
|---|---|
| (१) ---------------------------- | ---------------------------- |
| (२) ---------------------------- | ---------------------------- |
| (३) ---------------------------- | ---------------------------- |
| (४) ---------------------------- | ---------------------------- |
| (५) ---------------------------- | ---------------------------- |

**प्र.३ योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | उत्तर | 'ब' गट |
|---|---|---|
| (१) जागतिक पर्यावरण दिन | | (अ) वृक्षारोपण |
| (२) देवराई | | (आ) आज्ञापत्र |
| (३) छत्रपती शिवाजी महाराज | | (इ) ५ जून |
| (४) सालुमरदा थिमक्का | | (ई) देवाच्या नावाचे जंगल |

**प्र.४ परिसरातील झाडांची उदाहरणे लिहा.**




## उपक्रम

- बीजमाता राहीबाई पोपेरे यांची माहिती पालकांच्या मदतीने संकलित करा.
- तुमच्या परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांची मुलाखत घ्या.
- महाराष्ट्रातील देवराया, अभयारण्ये यांची माहिती आंतरजालाच्या मदतीने गोळा करा.
- आपल्या वापरातील कडधान्ये, बिया गोळा करून त्यांच्यापासून रोपे तयार करा.

***





# १२. राष्ट्रीय एकात्मता



**प्रसंग १**

एके दिवशी काय झाले, वेगवेगळे रंग एकमेकांशी भांडायला लागले. लाल रंग म्हणाला, “मीच सगळ्यात सुंदर आहे. माझा रंग जास्वदांसारखा, उगवत्या सूर्यासारखा आहे.”, पांढरा रंग म्हणाला, “नाही, मीच सुंदर आहे. माझा रंग शांततेचा आहे.”, हिरवा रंग म्हणाला, “अजिबात नाही! माझा रंग झाडाचा आहे, पानांचा आहे. माझ्याशिवाय तुम्ही पृथ्वीची कल्पनाही करू शकत नाही.”, निळा रंग म्हणाला, “अरे वा! मग काय तुम्ही आकाशाशिवाय, समुद्राशिवाय जगाची कल्पना करू शकता का?”

एवढ्यात हवेची झुळूक त्यांना म्हणाली “अरे, असे भांडू नका! आपल्या भारत देशाच्या राष्ट्रध्वजात बघा, वेगवेगळे रंग कसे एकत्र नांदत आहेत. त्यांच्याकडून काहीतरी शिकू या! भारतीय राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या एकतेचं, स्वातंत्र्याचं आणि सार्वभौमत्वाचं प्रतीक आहे.”

आपल्या देशाची विविध प्रतीके आहेत. ही प्रतीके आपल्यातील एकीची भावना जागृत ठेवण्यासाठी मदत करतात. आपल्या देशाच्या मूल्यांची आपल्याला आठवण करून देतात. राष्ट्रध्वजाप्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणजे आपले ‘राष्ट्रगीत’ होय. भारताचे राष्ट्रगीत ‘जणगणमन’ हे आहे. आपण सर्व जण वेगवेगळ्या भाषा बोलत असूनही हे गीत आपल्या सगळ्यांना पाठ आहे. राष्ट्रगीत सुरू असताना सर्वांनी सावधान स्थितीत उभे राहून राष्ट्रगीताचा सन्मान राखावा, हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे. तसेच ‘वंदेमातरम्’ हे आपले राष्ट्रीय गीत आहे.



### माहीत आहे का तुम्हांला?

**भारताच्या राष्ट्रध्वजातील रंगांचा अर्थ शोधा आणि लिहा.**

केशरी – ----------------------------------------------------------------

पांढरा – ----------------------------------------------------------------

हिरवा – ----------------------------------------------------------------

**अशोकचक्र– हे प्रगतीचे आणि गतीचे प्रतीक आहे. त्यात चोवीस आऱ्या आहेत.**

आपल्या भारत देशात वेगवेगळे लोक वेगवेगळ्या राज्यांमध्ये राहतात. वेगवेगळ्या भाषा बोलतात. वेगवेगळी वेशभूषा करतात. वेगवेगळे सण साजरे करतात. आपण सगळे एक आहोत. एकाच देशाचे नागरिक आहोत.



### प्रसंग २

राष्ट्रीय एकात्मतेविषयी बाई म्हणाल्या, “वर्गात आजूबाजूला बघा. एकमेकांहून आपण वेगळे दिसतो. तरीही या वर्गात एकत्र शिकत आहोत. गोष्टी सांगत आहोत, गाणी म्हणत आहोत. कधीतरी आपल्यात मतभेद होतात, ते आपण संवादातून मिटवतो. एकमेकांची काळजी घेतो, एकमेकांचा आदर करतो. या वर्गासारखाच ‘विविधतेने नटलेला’ असा आपला भारत देश आहे. असे वेगवेगळे असूनही एका देशात गुण्यागोविंदाने राहणं, आपणा सर्वांची ओळख ‘भारतीय’ असणं, यालाच म्हणतात ‘राष्ट्रीय एकात्मता.”

## वाचा.

अनेक अवयवांचा होतो एक मनुष्य
अनेक रंगांचे मिळून होते इंद्रधनुष्य
अनेक फुलांनी सजली ही फुलदाणी
अनेक भाषांत म्हणतो आम्ही गाणी
अनेक संस्कृती, विविध उत्सव, बहू आमुचे वेश
अनेक जण मिळून घडवतो आपला भारत देश।

## सांगा पाहू!

### प्रसंग ३

कल्पना करा, शाळेचे नवे वर्ष सुरू झाले आहे. तुमच्या वर्गात एका नवीन विद्यार्थिनीने प्रवेश घेतला आहे. तिची मातृभाषा बंगाली आहे. तिच्याशी तुम्ही कसा संवाद साधाल? तिला कशी मदत कराल? तिला वर्गात सामावून घेण्यासाठी काय कराल? शिक्षकांच्या मदतीने यावर चर्चा करा.

## चित्र रंगवा.

राष्ट्रध्वज



राष्ट्रीय पक्षी



राष्ट्रीय फळ



राष्ट्रीय फूल



## शोधा पाहू.

**राज्यपक्षी, राज्यफळ, राज्यप्राणी व राज्यफूल यांची माहिती आंतरजालाच्या मदतीने शोधा.**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. १ मे हा दिवस महाराष्ट्रात 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्याला जसा राज्यदिन आहे तसेच राज्यगीत, राज्यपक्षी, राज्यफळ, राज्यप्राणी व राज्यफूल इत्यादी गोष्टी असतात.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी जशी वेगवेगळी चिन्हे आणि प्रतीके महत्त्वाची आहेत, तसेच वेगवेगळे राष्ट्रीय सण महत्त्वाचे आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, म्हणून १५ ऑगस्ट हा दिवस आपण 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा करतो. २६ जानेवारी १९५०पासून भारतीय संविधान लागू करण्यात आले, त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो. हे सगळे दिवस आपण सर्व भारतीय एकत्र येऊन साजरे करतो. या दिवशी देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

### माहीत आहे का तुम्हांला ?

राकेश शर्मा : १९८४मध्ये राकेश शर्मा हे भारताचे पहिले अंतराळवीर ठरले. त्यांना तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी विचारले, "अंतरिक्षातून भारत कसा दिसतो ?" राकेश शर्मा यांनी उत्तर दिले, "सारे जहाँ से अच्छा !"

(पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला दिलेल्या QR कोडमधील लिंकद्‌वारे राकेश शर्मा यांचा video पाहा.)

## स्वाध्याय

**प्र.१ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) भारतीय राष्ट्रध्वजाचे वर्णन लिहा.

(२) भारताचे पहिले अंतराळवीर यांचे नाव काय आहे?

(३) राष्ट्रीय फूल कोणते आहे ?

**प्र.२ योग्य पर्याय निवडून लिहा.**

(१) तिरंगा ध्वजावर असणारे चक्र ---------------------

(अ) सुदर्शन चक्र (आ) अशोकचक्र (इ) परमवीर चक्र (ई) जलचक्र

(२) १५ ऑगस्ट ---------------------

(अ) स्वातंत्र्यदिन (आ) संविधान दिन (इ) महाराष्ट्र दिन (ई) प्रजासत्ताक दिन

**प्र.३ जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) राष्ट्रीय पक्षी | (अ) जनगणमन |
| (२) राष्ट्रीय फळ | (आ) वंदे मातरम् |
| (३) राष्ट्रीय गीत | (इ) आंबा |
| (४) राष्ट्रगीत | (ई) मोर |

**प्र.४ आपल्या मातृभाषेचे नाव सांगा. महाराष्ट्राच्या शेजारील राज्यांच्या भाषांची नावे लिहा.**

**प्र.५ पाठ्यपुस्तकाच्या मुखपृष्ठाचे निरीक्षण करून भारतातील वैविध्य स्पष्ट करा.**

### उपक्रम

- राष्ट्रीय प्रतीकांची माहिती मिळवा व त्यांची चित्रे संकलित करा.
- देशभक्तीपर गीतांचा संग्रह करा व त्यांचे संकलन चिकटवहीत करा.
- आपण राहतो त्या जिल्ह्याच्या सीमेवरील २-३ जिल्ह्यांमध्ये कोणत्या बोलीभाषा बोलल्या जातात, याची माहिती आंतरजालाच्या मदतीने मिळवा.

***

# १३. चला ऐकू या, बोलू या आणि समजून घेऊ या




**चित्रात काय दिसते ते सांगा ?**

- तुमच्या शाळेत ध्वजारोहण कोणकोणत्या तारखांना करतात ?
- तुम्ही ध्वजारोहणासाठी कायकाय तयारी करता याची आपापल्या गटात चर्चा करा.
- दहा रुपयांची नोट घ्या. त्यावरील चित्राबद्दल आई-वडिलांशी, शिक्षकांशी व इतरांशी चर्चा करा.




विद्यार्थी मित्रांनो, इतरांचे, आईवडिलांचे व शिक्षकांचे म्हणणे शांतपणाने ऐकून घेतले पाहिजे. आपण आपले विचार ठामपणे मांडले पाहिजेत. आपले विचार मांडताना इतरांच्या मतांचाही आदर केला पाहिजे. त्यातून आपल्या नेतृत्वगुणांचा विकास होत असतो.

विनामूल्य वितरणासाठी

### ऐकू या व बोलू या.

- राज्यगीत ऐका व तालासुरात म्हणा.
- झेंडावंदन कार्यक्रमात तुम्ही कोणकोणत्या घोषणा देता ते सांगा.

**खालील प्रसंगी तुम्ही काय कराल?**

- तुमचा मित्र आजारी आहे.
- मित्राच्या आजीला कमी दिसते. तिला रस्त्याच्या पलीकडे जायचे आहे.
- तुमच्या घरातील एक व्यक्ती वारंवार मोबाईल पाहते.

### समजून घेऊ या.

## एकीचे बळ

### चिमण्या आणि शिकारी.

बालमित्रांनो, तुम्ही ही कथा ऐकली आहे काय?

एका घनदाट जंगलात एका मोठ्या वडाच्या झाडावर अनेक चिमण्या राहत. त्या वडाच्या झाडाला लालचुटुक वटफळे लागत. चिमण्या त्यांचा फडशा पाडत. त्या चिमण्यांमध्ये एक हुशार व अनुभवी चिमणी होती. जी नेहमी सगळ्यांना एकत्र राहण्यास सांगत असे.

एके दिवशी जंगलात एक शिकारी आला. त्याने पाहिले, त्या वडाच्या झाडाजवळ चिमण्या आहेत. आपण या चिमण्यांना पकडू असा विचार त्याने केला. त्याने त्यासाठी एक युक्ती योजली. त्याने झाडाखाली चिमण्यांसाठी पुष्कळ दाणे टाकले. त्यावर जाळे पसरवून तो जवळच चिमण्यांची वाट पाहत लपून बसला.

थोड्याच वेळात चिमण्या ते दाणे टिपण्यासाठी खाली आल्या. त्या सगळ्याजणी दाणे टिपण्यात मग्न झाल्या. चिमण्या नकळतपणे शिकाऱ्याने पसरवलेल्या जाळ्यात अडकल्या. अरेच्चा! आता काय करावे? त्यांना सुचेना. चिमण्यांनी सुटकेसाठी धडपड सुरू केली; पण व्यर्थ! त्या साऱ्या जणी घाबरल्या आणि एकमेकींकडे पाहू लागल्या.

चिमण्यांचे प्रयत्न सुरूच होते, पण यश काही मिळेना. शेवटी हुशार चिमणी सर्वांना म्हणाली, "आपण सर्व जणी चोचीने जाळे पकडून एकाच वेळी उडू या. तिचे म्हणणे सर्वांना पटले. सर्वांनी ताकद लावली आणि जाळे घेऊन सर्व जणी एकाच वेळी आकाशात उडू लागल्या."

शिकारी चक्रावला, जाळे पकडण्यासाठी त्यांच्या मागे पळू लागला. पण चिमण्या काही त्याच्या हाती लागल्या नाहीत. तो धावताना खाली पडला. चिमण्या थोड्या अंतरावर असलेल्या उंदीरदादाकडे

गेल्या. मदतीसाठी त्याला बोलावू लागल्या. उंदीरदादा त्यांना पाहून त्याच्या मित्रांसह चिमण्यांच्या मदतीला धावला. उंदरांनी सगळे जाळे कुरतडून संकटात अडकलेल्या त्या चिमण्यांची काही क्षणांत सुटका केली. सर्व चिमण्यांनी त्यांचे खूप आभार मानले.



**सांगा पाहू!**

या गोष्टीतून आपण काय शिकलो?

### हे चित्र शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.

हे चित्र कोल्हापूरजवळील खिद्रेश्वर मंदिरातील आहे. दोन हंसांनी एक काठी चोचीत पकडली आहे. एका कासवाने ती काठी पकडली आहे. वरील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट सांगता येईल का? शिक्षक-पालकांच्या मदतीने गोष्ट तयार करा.



खिद्रेश्वर मंदिरातील शिल्प

हीच बाब आपल्यालाही लागू होते. आपल्या देशात आपण सर्वांनी एकजुटीने, एकत्रितपणे राहिल्यास अनेक अशक्य असणाऱ्या गोष्टी आपण सहज व लवकर करू शकतो, नाही का?



## माहीत आहे का तुम्हांला ?



१९ वर्षांखालील विश्वविजेता महिला क्रिकेट संघ




भारताने महिला विश्वचषक क्रिकेट अजिंक्यपद पटकावले.



जागतिक दृष्टिहीन विश्वचषक क्रिकेट स्पर्धा– भारतीय महिला विजेता संघ

२०२५मधील जागतिक स्तरावरील महिला क्रिकेट विश्वचषकाच्या विविध स्पर्धांमध्ये या संघांनी चमकदार कामगिरी करून विजेतेपद पटकावले आहे. आपल्या भारत देशाला अभिमान वाटावा अशा या बाबी आहेत. क्रिकेटसारख्या सांघिक खेळात एकजुटीने यश मिळवून आपल्या देशाची मान गौरवाने उंचावता येते, याची ही उदाहरणे आहेत. याचबरोबर क्रिकेट खेळताना दृष्टिहीन महिलांची यातील कामगिरी खूपच कौतुकास्पद आहे.



## स्वाध्याय

**प्र.१ खालील प्रसंगी तुम्ही कसे वागाल ते लिहा.**

(१) आपले विचार मांडताना– ..........................................................

(२) वडीलधारी आपणांस मार्गदर्शन करताना – .............................................

(३) शाळेत राष्ट्रगीत सुरू असताना – .......................................................

(४) बिस्किट, चॉकलेट खाल्ल्यावर त्यांचे रॅपर्स तुमच्याजवळ आहेत. – ..........................

(५) तुमच्या सहवासात दिव्यांग व्यक्ती आली, तर – ..........................................

**प्र.२ खालील चित्रात काय दिसते त्यावर आपले मत लिहा.**



कचरा

(१) ओला कचरा, सुका कचरा या कचरापेट्यांच्या आजूबाजूला कचरा साचला आहे.

..................................................................

..................................................................

(२) मुलगा वृक्षारोपण करत आहे.

..................................................................

..................................................................


वृक्षारोपण

(३) दिव्यांग विद्यार्थिनीला व्हिलचेअरवरून मित्र शाळेतून नेत आहेत.

..................................................................

..................................................................


दिव्यांग विद्यार्थिनी

### उपक्रम

- भारतीय महिला खेळाडूंची चित्रे जमा करून, चिकटवहीत चिकटवून त्यांची नावे लिहा.
- इसापनीती आणि पंचतंत्र यांमधील गोष्टी पालकांकडून व शिक्षकांकडून मिळवा. त्या वर्गात सांगा.
- ‘मूल्यवर्धन’ उपक्रमातील तुम्हांला आवडलेल्या एका प्रसंगाची माहिती लिहा.

***

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला **'वाईट'** वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.




हे बटण दाबा.

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.




चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

आपल्या सभोवतालचे जग भाग-२
इयत्ता तिसरी (मराठी माध्यम)

(विनामूल्य वितरणासाठी)

